**JAYDEEP B. KULKARNI**
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
**Office :** Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
**Resi. :** "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर. (0241) 2343896/2341196

Volume - 73 | Issue- 206 | Marathi Daily | Monday 21/4/2025 | Pages - 6 | Price- Rs. 3

अग्रलेख: बंगाल सतत का धुमसते? पान २



जैन समाजाचे बुधवारी महाअधिवेशन पान ५



समर्थ प्रशालेचे नाव उज्ज्वल करावे- क्षीरसागर पान ६

## महापालिका प्रशासनाला कारवाईचा विसर

# जुन्या व भंगार वाहनांचा रस्त्यावरच ठिय्या





### बांधकाम साहित्यांनीही अडवले रस्ते

नगर शहरातील विविध रस्त्यांवर नादुरुस्त व भंगार वाहने आहेत. रस्त्यात काही ठिकाणी बांधकामाचे नवीन-जुने साहित्य, राडारोडा टाकून रस्ता अडवण्याचेही प्रकारही सुरू आहेत. रस्त्यातील अशा साहित्यावरही जप्तीची कारवाई करून फौजदारी स्वरुपाचा गुन्हा संबंधित व्यक्तीविरोधात दाखल केला जाण्याची गरज आहे.

**समाचार/नगर-दि.२१**

रस्त्यातील नादुरुस्त व भंगार वाहने हटवण्याचे आदेश महापालिकेने संबंधितांना दिले होते. संबंधित वाहने हटवली नाही तर ती जप्त करण्यात येऊन, संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा महापालिका प्रशासनाने दिला होता. मात्र, शहर व उपनगरात अनेक ठिकाणी अशी वाहने रस्त्याच्या कडेला पडून आहेत. महापालिका प्रशासनालाही यासंबंधी कारवाई करण्याचा विसर पडला आहे. शहरातील अनेक रस्ते नादुरुस्त वाहने उभी करण्याचे जणू हक्काचे ठिकाण बनत असून त्यामुळे रहदारीलाही अडथळा निर्माण होऊ लागला आहे. या वाहनांचा वाली कोण? आणि या वाहनांना हटविण्याची जबाबदारी कोणाची? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

मिस्कीन मळा रोड, जुने कोर्ट रोड, स्वामी विवेकांनद चौक, लालटाकी अप्पू हत्ती चौक ते सर्जेपुरा, भोसले आखाडा, कोठला, नवीपेठ, तोफखाना, मध्य शहरातील प्रमुख रस्त्यांवर जुनी व बंद अवस्थेतील वाहने लावल्याची व त्यामुळे रहदारीस अडथळा होत असल्याचे तसेच अस्वच्छता होत असल्याचे महापालिका प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. शहरातील रहदारीस अडथळा होणारी अतिक्रमणे व वाहतूक कोंडी टाळण्यासाठी काही दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत (पान ३ वर)

मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केले आश्चर्य

## हिंदी भाषेला विरोध करतो अन् इंग्रजीचे गोडवे गातो

**समाचार/मुंबई-दि.२१**




हिंदीसारख्या भारतीय भाषेला आपण विरोध करतो अन् इंग्रजी भाषेचे गोडवे गातो. इंग्रजीला डोक्यावर घेऊन मिरवतो, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी भाषेला होणाऱ्या विरोधावर आश्चर्य व्यक्त केले आहे. आपल्याला इंग्रजी भाषा जवळची आणि हिंदी भाषा दूरची असे का वाटते, याचाही विचार केला पाहिजे, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

शालेय शिक्षणात हिंदी भाषा सक्तीची केल्याच्या विषयावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न होतोय, असे म्हणणे चुकीचे आहे. महाराष्ट्रात मराठीचीच सक्ती राहणार असून इतर कुठलीही सक्ती नाही. पण मला याचेच आश्चर्य वाटते की, हिंदीसारख्या भारतीय भाषेला आपण विरोध करतो आणि इंग्रजीचे गोडवे गातो. हिंदी भाषा अनिवार्य केलेली नाही. मराठी भाषा अनिवार्य आहे. मात्र नवीन शैक्षणिक धोरणात तीन भाषा शिकणे (पान ३ वर)

### उठाठेव


– विवेक मेहेत्रे



आमचे साहेब काही आठवडे अज्ञात अवस्थेत जाणार आहेत...तेव्हा तेवढा काळ त्यांच्या ह्या कटआऊटवर काम भागवायला सांगितलंय!

### निवडक

## अश्विनी बिद्रे हत्या प्रकरणी कुरुंदकरला जन्मठेप



**मुंबई, दि.२१–** सहाय्यक पोलीस अधिकारी अश्विनी बिद्रे यांच्या हत्या प्रकरणात पनवेल सत्र न्यायालयाने निकाल दिला आहे. मुख्य आरोपी अभय कुरुंदकरला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तसेच २० हजारांचा दंडही सुनावण्यात आला आहे. तर या प्रकरणातील इतर दोन आरोपी म्हणजेच कुंदन भंडारी आणि महेश फळणीकर या दोन आरोपींना प्रत्येकी सात वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. २०१६ मध्ये अश्विनी बिद्रे यांची हत्या करण्यात आली. पोलीस अधिकारी अश्विनी बिद्रे अपहरण आणि हत्या प्रकरणात बडतर्फ वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय कुरुंदकर मुख्य आरोपी असल्याचे समोर आले. तर महेश फळणीकर आणि कुंदनलाल भंडारी यांना पुरावा नष्ट केल्याप्रकरणी दोषी जाहीर करण्यात आले. मात्र याप्रकरणातील दोन क्रमांकाचा आरोपी ज्ञानदेव उर्फ राजू पाटील याला पुराव्या अभावी निर्दोष सोडण्यात आले. ९ वर्षानंतर या प्रकरणाचा निकाल लागला आहे. या प्रकरणातील पोलिसांच्या भूमिका आणि कार्यपध्दतीवर न्यायालयाने ताशेरे ओढले.

## अविश्वास ठरावाआधीच कर्जत नगराध्यक्षांचा राजीनामा



**समाचार/नगर-दि.२१**

अविश्वास ठरावाआधीच कर्जतच्या नगराध्यक्ष उषा राऊत यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. यावेळी त्यांनी सभापती राम शिंदे यांच्यावर आरोप केले. दरम्यान, कर्जत नगरपंचायतमध्ये महाविकास आघाडीत देखील फूट पडली आहे. काँग्रेसचे तीन नगरसेवक देखील रोहित पवार यांच्या विरोधात गेले आहेत. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर रोहित पवार यांना हा मोठा धक्का मानला जात आहे.

कर्जतच्या नगराध्यक्ष उषा राऊत यांनी हा राजीनामा जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपवला आहे. उषा राऊतांवर नव्या कायद्यानुसार, दाखल केलेल्या अविश्वास प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांनी आज विशेष सभा आयोजित केली होती. मात्र, त्याआधीच उषा राऊत यांनी आपला पदाचा राजीनामा दिला आहे. कर्जत नगरपंचायत कर्जत नगरपंचायत आमदार रोहित पवार यांच्या ताब्यात आहे. त्यांना धक्का देण्यासाठी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आठ नगरसेवक फोडले होते. त्यानुसार कर्जतच्या नगराध्यक्ष राऊत यांच्या विरोधात सत्ताधारी ११ नगरसेवकांसह भाजपाच्या २ अशा १३ नगरसेवकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला.

सोशल मीडियावरील तक्रारींवर कार्यवाही; नागरी सुविधा ऑनलाईन होणार

## ई-ऑफिस प्रणालीमुळे मनपाच्या कामकाजात गतिमानता

**समाचार/नगर-दि.२१**

महापालिकेने गेल्या दोन महिन्यांपासून प्रशासकीय कामकाजासाठी ई-ऑफीस प्रणालीचा वापर सुरू केला आहे. बहुतांशी कामकाज, प्रस्ताव, पत्रव्यवहार या प्रणालीद्वारे सुरू आहे. त्यातून कामकाजात गतिमानता येत आहे. पेपरलेस वर्कमुळे पर्यावरणाचेही रक्षण होण्यास मदत होत आहे. एप्रिल महिन्यापासून संपूर्ण कामकाज या प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. लवकरच नागरी सुविधा, तक्रारीसाठीही ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यातून नागरिकांचा वेळही वाचेल





व तक्रारींचा वेळेत निपटारा होईल, असा विश्वास आयुक्त यशवंत डांगे यांनी व्यक्त केला.

डांगे यांनी सांगितले की, महापालिका प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत ई-ऑफिस प्रणाली यशस्वीरित्या कार्यान्वित केली आहे. या प्रणालीमुळे महापालिकेतील प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ, पारदर्शक आणि गतिमान झाले आहे. यामध्ये दस्तऐवजांची देवाणघेवाण, फायलींचे ट्रॅकिंग, निर्णय प्रक्रियेतील गती आणि जबाबदारी यामध्ये लक्षणीय सुधारणा झालेली आहे. या उपक्रमामुळे कागदांचा वापर कमी झाला असून, ही प्रणाली पर्यावरणपूरक ठरली आहे. वेळेची बचत, कार्यक्षम संवाद आणि फायलींवरील नियंत्रण वाढल्याने प्रशासनाची कार्यशैली अधिक (पान ३ वर)



**माठांना मागणी :** सावेडी बसस्थानकासमोर गुजराथ, राजस्थान तसेच महाराष्ट्रच्या काही जिल्ह्यातून काळे, लाल, पांढऱ्या रंगाचे विविध आकाराचे माठ मोठ्या प्रमाणात विक्रीस आले असून उन्हाच्या वाढत्या तापमानमुळे त्यांना चांगली मागणी आहे. (छाया-मंदार साबळे)

श्रीरामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटी निवडणूक

## सद्भावना पॅनलचा दणदणीत विजय

**समाचार/नगर-दि.२१**

येथील श्रीरामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटी लि.,च्या संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूकीचे मतदान रविवार दि.२० एप्रिल २०२५ ला सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत भवानीनगर येथील श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाऊंडेशन स्कूल मध्ये झाले. सोसायटीच्या पारदर्शक कामकाजामुळे सद्भावना पॅनेलचे सर्वच्या सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले.



सभासदांनी सोसायटीची सूत्रे संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांच्याच हाती असणे सोसायटी हिताचे आहे, हे मतांच्या माध्यमातून सांगितले.

निवडणूक निर्णय अधिकारी शुभांगी गोंड यांनी रात्री ८ वाजता निकाल जाहीर केला. ढोल-ताशाच्या गजरात, गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि पेढ्यांचे वाटप करत या निकालाचे स्वागत करण्यात आले. उपस्थित सर्वांनीच आनंदोत्सव साजरा केला. मतमोजणी स्थळापासून विशाल गणेश मंदिरापर्यंत (पान ३ वर)

## पाच दारू विक्रेत्यांवर पोलिसांची छापेमारी

**समाचार/नगर-दि.२१**

संगमनेर तालुक्यातील घारगाव परिसरात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पाच अवैध दारू विक्रेत्यांवर छापे टाकले. यात ७३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना जिल्ह्यामधील अवैध व्यावसायिकांवर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

त्यानुसार पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखा व तपास पथकातील पोलीस अंमलदार गणेश लोंढे, बिरप्पा करमल, शाहीद शेख, गणेश धोत्रे, रणजीत जाधव, रमीजराजा आत्तार व उमाकांत गावडे अशांचे पथक तयार करून घारगाव पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंद्यांवर कारवाई करण्याच्या सुचना दिल्या. २० एप्रिल २०२५ रोजी पथकाने घारगाव पोलीस स्टेशन हद्दीत अवैध व्यावसायिकांची बातमीदारामार्फत तसेच अवैध दारू विक्रेत्यांची माहिती काढुन घारगाव पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अवैध दारू विक्रेत्यांविरूध्द पंचासमक्ष ५ ठिकाणी छापे टाकुन कारवाई केली.

कारवाईमध्ये घारगाव पोलीस स्टेशनला महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये ५ गुन्हे दाखल करण्यात येऊन ७३ हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

बांगलादेशचे कृतज्ञतापत्र देऊन वीरपत्नीचा सन्मान

# शहीद कॅ. कुलकर्णी यांच्या पुतळ्याचे राजस्थानमध्ये अनावरण

**अहिल्यानगर, दि. २१ –** १९७१ मध्ये झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धात बांगलादेशच्या रणभूमीवर अतुलनीय शौर्य गाजवताना नगरचे सुपुत्र कॅप्टन विश्वनाथ वासुदेव तथा राजाभाऊ कुलकर्णी यांना वीरमरण आले. त्यांच्या वीरपत्नी श्रीमती रेवाताई यांना भारतीय लष्कराच्या ६७ मैदानी तोफखाना वीर मराठा रेजिमेंटतर्फे आज सन्मानित करण्यात आले. बांगलादेशचे राष्ट्रपती आणि पंतप्रधानांची स्वाक्षरी असलेले कृतज्ञतापत्र आणि गौरवचिन्ह त्यांना यावेळी प्रदान करण्यात आले.

सावेडी रस्त्यावरील गुलमोहोर या रेवाताईंच्या निवासस्थानी दुपारी ६७ मैदानी तोफखाना वीर मराठा रेजिमेंटचे प्रमुख कर्नल श्यामकिशोर द्विवेदी, निवृत्त मेजर जनरल एच. एस. बेदी, मेजर नीरज पवार, लेफ्टनंट निखिलकुमार, अधिकारी संतोष काळोखे, सब आर. सी खेर्डे, गोफण, कर्नल सी. संदीप आदि आले.

राजाभाऊंच्या रेजिमेंटमधील अधिकारी आपल्या भेटीसाठी आलेले पाहून रेवाताईही भावविवश झाल्या.

**पूर्णाकृती पुतळा**

६७ मैदानी तोफखाना वीर मराठा रेजिमेंटच्या बिकानेर (राजस्थान) येथील मुख्यालयात कॅप्टन राजाभाऊंचा पूर्णाकृती पुतळा नुकताच उभारण्यात आला आहे. त्यासंबंधीचा माहितीपट यावेळी दाखवण्यात आला.

यापूर्वी वीर मराठा रेजिमेंट पंजाब मधील फिरोजपूर येथे असताना तेथील लष्करी छावणीतील एका संकुलास शहीद कॅप्टन कुलकर्णी यांचे नाव देण्यात आले होते.

रेजिमेंटचे सन्मानचिन्ह, कॅ राजाभाऊंची प्रतिमा, या बटालियनचे दैवत असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, बांगलादेशने त्यांना पाठवलेले कृतज्ञतापत्र, गौरवचिन्ह, तसेच बांगलादेश स्वातंत्र्य संग्रामात हौतात्म्य प्राप्त झालेल्या भारतीय



**नगरचे सुपुत्र कॅप्टन राजाभाऊ कुलकर्णी यांच्या वीरपत्नी रेवाताई यांना भारतीय लष्करातर्फे सन्मानित करताना बांगलादेशच्या राष्ट्रपती आणि पंतप्रधानांची स्वाक्षरी असलेले कृतज्ञतापत्र व गौरवचिन्ह प्रदान करण्यात आले.**

अधिकारी व जवानांची अधिकृत सूची आणि माहिती, बांगलादेशचे राष्ट्रपिता शेख मुजीबूर रहमान यांनी लिहिलेले आत्मकथन पुस्तक रेवाताईंना यावेळी प्रदान करण्यात आले.

बांगलादेशमधील शिरामणी येथील घनघोर युद्धात कॅ कुलकर्णी यांनी पाकिस्तानी सैन्याशी लढताना दाखविलेल्या अतुल्य शौर्यामुळे वीर मराठा रेजिमेंटला आजही शौर्य आणि समर्पणाची प्रेरणा मिळते, असे कर्नल द्विवेदी यांनी यावेळी नमूद केले.

रेवाताईंनी रेजिमेंटसाठी ५१ हजारांचा धनादेश दिला. स्नेहालयाच्या वाटचालीवरील मेधा देशमुख यांनी लिहिलेले पुस्तक 'अप अगेन्स्ट डार्कनेस' हे यावेळी सर्व अधिकाऱ्यांना भेट देण्यात आलं.

लष्करी अधिकाऱ्यांचे स्वागत कॅ. राजाभाऊ यांचे कुटुंबीय सुषमा देवगावकर आणि डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार भूषण देशमुख, डॉ. वैशाली आणि डॉ. प्रभास पाटील, विनोद गुंडू आदि उपस्थित होते.

१९६२ सालच्या भारत-चीन युद्धानंतर स्थापन झालेल्या ६७ वीर मराठा रेजिमेंटमधील निवृत्त अधिकारी आणि सैनिकांचे महासंमेलन नगरमध्ये संपन्न झाले. यानिमित्ताने देशभरातील अधिकारी आणि सैनिक नगरमध्ये एकत्र आले होते.

संपादकीय

# बंगाल सतत का धुमसते?

गेल्या काही दिवसांपासून पश्चिम बंगालमधील तीन जिल्हे दंगलीच्या वणव्यात होरपळत आहेत. भाजपने पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि बिहारमधील विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नजरेसमोर ठेवून वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर करून घेतले असले, तरी सत्ताधारी आणि विरोधक त्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करत असून मतांच्या लालसेपोटी समाजात अस्वस्थता पसरवली जात आहे. पश्चिम बंगालमधील तीन जिल्हे वक्फ कायद्यानिमित्त होत असलेल्या दंगलीमध्ये होरपळत आहेत. पश्चिम बंगाल सरकारचे दंगल हाताळणीतील अपयश उघड झाले आहे. त्यामुळे तर उच्च न्यायालयाला केंद्रीय सुरक्षा दलांना तिथे पाठवावे लागले. त्यानंतर काही प्रमाणात दंगल आटोक्यात आली असली, तरी आता मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यात 'सीएए' आणि वक्फ कायदा लागू होऊ देणार नाही, अशी भूमिका घेतली आहे. अर्थातच पश्चिम बंगालमधील ३१ टक्के मुस्लीम समाज डोळ्यासमोर ठेवून ती घेतली आहे, हे वेगळे सांगायला नको; परंतु केंद्र सरकारने केलेले कायदे संपूर्ण देशासाठी असताना पश्चिम बंगालसारखे एखादे राज्य अशी वेगळी भूमिका घेऊ शकते का, हा खरा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर नाही असे आहे. केंद्राने केलेल्या कायद्याच्या विरोधात भूमिका घेण्याचा राज्यांना फारच मर्यादित अधिकार आहे. ते कसे हे जाणून घेतले पाहिजे. वक्फ हा मध्यवर्ती मुद्दा आहे. वक्फचा समावेश भारतीय राज्यघटनेच्या समवर्ती यादीत करण्यात आला आहे. याचा अर्थ केंद्र आणि राज्य सरकार असे दोघेही त्यावर कायदे करू शकतात. केंद्र सरकारने कोणताही कायदा केल्यास त्याला आव्हान देण्याचा किंवा त्याचे पालन न करण्याचा अधिकार राज्यांना नाही. वक्फ दुरुस्ती कायद्याच्या विरोधात पश्चिम बंगालमध्ये विविध भागांमध्ये अशांतता पहायला मिळाली. सर्वात वाईट परिस्थिती मुर्शिदाबादमध्ये दिसली. समशेरगंज, धुलियान–सुतीसह अनेक ठिकाणी हिंसाचार झाला. सरकारी मालमत्तेची तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आली. राज्याच्या इतर भागातही अशांतता पसरली आणि काहीजणांना पश्चिम बंगालमधील हिंसाचारात जीव गमवावा लागला. हिंसाचारामुळे मुर्शिदाबादमधील सर्वसामान्य नागरिक भयभीत झाले. या अशांततेमागे कोण आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. भाजप नेते आणि विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांनी म्हटले आहे की संपूर्ण मुर्शिदाबाद जिल्हा आता खासदार आणि आमदारांच्या नियंत्रणाखाली नाही, तर 'पीएफआय', 'सिमी' आणि 'अन्सारुल बांगला टीम' यासारख्या अतिरेकी संघटनांच्या आणि मालदा आणि मुर्शिदाबादमधील कट्टरपंथी गटांच्या नियंत्रणाखाली आहे. सुवेंदू अधिकारी यांच्या वक्तव्यात ममता बॅनर्जी यांच्यावर टीकेचा रोख असला, तरी त्यांनी केलेला बांगलादेशी संघटनांचा उल्लेख पाहता पश्चिम बंगालमधील हिंसाचाराला बांगलादेशी घटक कारणीभूत आहेत आणि त्यात राज्याबरोबरच केंद्र सरकारचे अपयश अधोरेखित होते. पोलिसांशी चकमकीत मोठा वर्ग सामील आहे. तोच तोडफोड घडवून आणत आहे; मात्र स्थानिकांचे म्हणणे आहे की हाणामारी करणारे मुख्य मिरवणुकीमध्ये सहभागी नव्हते. वक्फविरोधी मोर्चा संपल्यानंतर वेगळेच लोक हिंसाचार पसरवत आहेत. ते पोलिसांवर दगडफेक करत आहेत. बॉम्ब फेकत आहेत, लूटमार करत आहेत. हे व्यावसायिक गुन्हेगार असल्याचे दिसून येते. अशांतता पसरलेल्या भागातील रहिवासी हिंसाचारात सामील असलेल्यांना ओळखत नाहीत. देशात तसेच पश्चिम बंगालमध्ये 'एनआरसी' आणि कृषी कायद्याच्या विरोधात निदर्शने झाली; पण तिथे सर्वसामान्यांवर हल्ले झाले नाहीत. त्यामुळे या हिंसाचारात बांगलादेशी कट्टरवाद्यांचा हात असण्याची भीती आहे. मुर्शिदाबाद हा बांगलादेशच्या सीमेला लागून असलेला जिल्हा आहे. बाहेरील हल्लेखोरांनी येथे प्रवेश करणे असामान्य नाही. काही वर्षांपूर्वी कालियाचक पोलिस ठाणे जाळल्याच्या प्रकरणात कोणतीही कट्टरतावादी शक्ती नसून या परिसरात सक्रिय असलेल्या बनावट नोटा आणि अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळ्यांशी संबंधित गुन्हेगार असल्याचे उघड झाले आहे. धुलियान, सुती हेदेखील पश्चिम बंगालमधील संवेदनशील क्षेत्रांपैकी एक आहे. एका बाजूला झारखंडची सीमा तर दुसऱ्या बाजूला बांगलादेशची सीमा आहे. अमली पदार्थांची तस्करी आणि बनावट चलनाचा हा एक मार्ग आहे. याच सुमारास पश्चिम बंगाल शिक्षक भरती घोटाळ्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, तृणमूल सरकारने मध्यममार्ग शोधला आहे. या घोटाळ्यात २५,७५३ शिक्षकांचा समावेश आहे. शालेय सेवा आयोगाने (एसएससी) १९,००० पात्र शिक्षकांची यादी राज्य शिक्षण विभागाला पाठवली आहे. घोटाळा उघडकीस येईपर्यंत कार्यरत असलेल्या सुमारे सात हजार शिक्षकांनाच अपात्र घोषित केले जाईल. राज्य सरकार लवकरच पात्र शिक्षकांची नावे सार्वजनिक करू शकते. ३ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने या घोटाळ्याबाबत कोलकाता उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला होता. उच्च न्यायालयाने २०१६ ची शिक्षक आणि कर्मचारी भरती बेकायदेशीर ठरवून रद्द केली होती. भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले होते. नोकरी गमावलेले शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी दहावीच्या परीक्षेच्या 'ओएमआर शीट्स' सार्वजनिक करण्याची मागणी करत आहेत. सीबीआयने १९ हजार पात्र उमेदवारांची यादी तपासली. पश्चिम बंगाल सरकारने २०१६ मध्ये राज्यस्तरीय निवड चाचणी–२०१६ (एसएलसीटी) द्वारे सरकारी आणि अनुदानित शाळांसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केली. त्यानंतर, २४,६४० रिक्त पदांसाठी २२ लाखांहून अधिक लोकांनी भरती परीक्षेत भाग घेतला होता. या भरतीमध्ये निवड होण्यासाठी ५ ते १५ लाख रुपयांची लाच घेतली गेल्याचा आरोप आहे. दरम्यान, ममतादीदी बेफाम विधाने करत कायद्याच्या राज्यालाच आव्हान देत आहेत.

## हिवरे बाजारमधील वणवा ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे नियंत्रणात



**समाचार/नगर–दि.२१**

आदर्शगाव हिवरेबाजार येथील डोंगराला दि. १९ एप्रिल रोजी दुपारी १.०० वाजता आग लागली. पद्मश्री पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हिवरे बाजारमध्ये ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यन्वित असल्याने तरुण व ग्रामस्थ घटनास्थळी हजर झाले.ग्रामस्थ व तरुण मंडळ तसेच ग्रामवन समितीचे सदस्य यांच्या अथक प्रयत्नातून आग तब्बल ५ तासांच्या प्रयत्नानंतर नियंत्रणात आली.

गेल्या महिनाभरात हिवरे बाजारच्या डोंगराला वणवा लागण्याची ही तिसरी वेळ असून शेजारील गावातील शेतकऱ्यांनी शेताचा बांध पेटवून दिल्यामुळे डोंगराला आग लागली. सन २०१८ पासून आतापर्यंत जवळपास २३ वेळा हिवरे बाजारचे ग्रामस्थांनी डोंगराची आग विझवली आहे.

## वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी ॲड. सुद्रिक यांचे व्याख्यान

**समाचार/नगर–दि.२१**

येथील अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज आणि रूग्णालय मनमाड रोड, सावेडी, येथील फौजदारीतील ख्यातनाम वकील ॲड. सतिशचंद्र सुद्रिक यांना न्याय वैद्यक शास्त्र या विषयावर वैद्यकिय शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांसाठी प्राचार्य डॉ. सुनिल पवार यांनी व्याख्यानासाठी आमंत्रित केले होते.



ॲड. सुद्रिक यांनी विस्तृत पणे बर्न, स्ट्रॅन्ग्यूलेशन, हॅगींग, पॉयझनिंग, थ्रोटलिंग, ड्रॉऊनिंग, ड्रायड्राऊनिंग, प्युट्रिफिकेशन, डिकॉम्पोझीशन, मृत्युचा वेळ, मृत्युपुर्व जवाव नोंदताना डॉक्टरची कर्तव्य इ. विषयांवर कथन केले वरील गोष्टींचा विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यात कायम स्वरूपी उपयोग होईल, तसेच रूग्णाचा केस पेपर हा नेहमी काळजीपुर्वक तयार करावा कारण एखादा रूग्ण न्यायालयात अथवा ग्राहकमंचात डॉक्टरांच्या विरोधात गेल्यास तोच केस पेपर त्यांना वाचवू शकतो, केस पेपर व्यवस्थित नसेल तर वकीलही डॉक्टरांना मदत करू शकत नाहीत. तसेच संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष न्यायालयात कामकाज पाहण्यास पाठविणे, तसेच शवविच्छेदन करतानाचे निरीक्षण करण्यास पाठवणे तसेच नाशिक येथील प्रयोगशाळेतील रासायनिक पृथककरण कसे करतात याचे निरीक्षणासाठी पाठवतात या बद्दल ॲड. सुद्रिक यांनी समाधान व्यक्त केले व भविष्यामध्ये परिपुर्ण डॉक्टर कसे होतील या बद्दल संस्था घेत असलेल्या परिश्रमावद्दल कौतुक केले .

## शुभमंगल (सावधान)...

प्रशांत आणि पल्लूची ते वयाच्या १७–१८ वर्षांचे होते तेव्हाची ओळख. दोघांचे शिक्षण चालू होते. लहान वयातच हे नाते प्रेमात बदलू लागले. मध्ये मध्ये भांडणे,वाद–विवाद सुरू असायचे.मित्रमंडळी परत परत त्यांचे पॅच–अप करत असत. पल्लू हुशार आणि खटपटी होती. चांगली शिकू लागली. परंतु प्रशांत हा जरा अभ्यासात,व्यवहार ज्ञानात कमी पडत होता. त्याचे शिक्षण जेमतेम बारावीपर्यंतच झाले. पल्लूला मात्र चांगला आयटी कंपनीमध्ये जॉब लागला. प्रशांत छोटे–मोठे व्यवसाय, कोर्सेस करत होता परंतु त्याचा फारसा जम बसत नव्हता. तरीदेखील मजल दरमजल करता करता दोघांनी घरातल्यांना लग्नाचा विचार सांगितला. प्रशांतच्या आई–वडिलांचे म्हणणे होते, आपण जरा थांबू कारण प्रशांतचे करिअर सेट नाहीये. परंतु पल्लूच्या आई वडिलांच्या मते कोणी लवकर काम करणार, कोणाला उशीर होणार आपण लग्न करून टाकूया. कारण दहा वर्ष एकमेकांना ओळखत आहेत. आता तेवढे एकमेकांना समजून घेतील. खरेतर एकमेकांना समजण्यासाठी आणि लग्न करण्यासाठी दहा वर्षांची ओळख काही कमी नाही.अशा विचारांनी घरातल्या घरात लग्न झाले देखील. बारावी पास मुलाला आयटीमध्ये नोकरी करणारी बायको मिळाली कशी? अशी चर्चा तर होत होतीच. परंतु पल्लूचे प्रशांतवर अपार प्रेम असणार, असेदेखील सगळ्यांचे म्हणणे होते. सुरुवातीला काही दिवसातच पल्लू नाराज असल्याचे तिच्या वागण्या बोलण्यातून जाणवू लागले. पण मुळातच अबोल, शांत असणारी सोज्वळ मुलगी नाराज असेल याची खात्री होत नव्हती. ती सोमवार ते शुक्रवार सासरी राहून वर्क फ्रॉम होम करत असे आणि प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवारी रात्रीपासून ते रविवारपर्यंत एकाच शहरात असलेल्या माहेरी ती जात असे. सहा महिन्यांनी पल्लूने दिल्लीला चांगल्या पगाराची नोकरी मिळाल्याचे फर्मान काढले आणि मी जात आहे असे जाहीर देखील केले. इकडे नवरा,सासू–सासरे यांनी आडकाठी घालण्याचा प्रश्नच नव्हता. जिथे त्यांचा मुलगाच काम करत नव्हता तर ते सुनेला ही नोकरी करू नको असे कसे म्हणणार? विश्वासाने तिला दिल्लीला पाठवले. दिवसेंदिवस पल्लूचे घरी येणे कमी होऊ लागले. सणावाराला चार दिवस आली तरी त्यातले दोन अडीच दिवस माहेरी असायची. घरी येण्याची वारंवारता कमी होऊ लागली. परंतु प्रशांतच्या समस्यांना जरा वेगळ्या चष्म्यातून बघायला हवे होते. मानसशास्त्रामधील स्लो लर्नर ज्याला बॉर्डर लाईन इंटेलेक्च्युअल फंक्शनिंग (BIF)म्हणून संबोधले जाते अशा प्रकारच्या समस्यांचा प्रशांतवर परिणाम होत होता. ज्यामध्ये सर्वसामान्यांपेक्षा या व्यक्तींना काही गोष्टी शिकण्यास कठीण जातात. समजायला वेळ लागतो त्यांना अनेक शैक्षणिक आव्हानांना सामोरे जावे लागते आणि म्हणूनच अशा व्यक्ती पहिल्यापासूनच मागे पडत जातात आणि त्यांच्या वयांच्या व्यक्तींच्या तुलनेत कमी पडतात. परंतु बाकी जीवन सर्वसामान्यांप्रमाणेच असल्यामुळे ही समस्या सहजासहजी लक्षात येत नाही.स्लो लर्नर यांची मुख्य कारणे म्हणजे शिक्षणअक्षमता (लर्निंग डिसॅबिलिटी /डिसऑर्डर) लहानपणापासूनच उद्भवलेले शारीरिक आजार, घरातील परिस्थिती,वातावरण इ. आता ही मुले पुढील आयुष्यात काहीच करू शकत नाहीत, असे वाटू शकते परंतु सुप्रसिद्ध चित्रकार, वास्तुकार, मूर्तिकार लिओनार्दो द विंची, दिव्याचा शोध लावणारा थॉमस अल्वा एडिसन, भौतिक शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन, चित्रकार पिकासो ही यादी बघता अशी मुले काय काय चमत्कार करू शकतात याची कल्पना येईल. वरील प्रत्येकाला त्यांच्या शाळांमधून काढून टाकण्यात आले होते परंतु मदत, योग्य सहाय्य, योग्य विशिष्ट पद्धतीने शिकवणे,समजून घेणे,लहान वयातच निदान होणे यामुळे ही मुले असामान्य उंची गाठू शकली. या मुलांच्या अशा परिस्थितीमुळे शिक्षणाचा पाया कच्चा राहतो आत्मविश्वास कमी होतो. शिक्षणाची आवड कमी होते आणि आयुष्य कंटाळवाणे होते. स्वभाव आळशी आणि निरुत्साही बनत जातो असे दुष्टचक्र चालू होते. अगदी अशा पद्धतीच्या आयुष्याचे उदाहरण म्हणजे प्रशांत. खरे तर योग्य मार्गदर्शन समजून घेण्याची गरज सतत विश्वासाने दिलेला आधार याची गरज होती. लहानपणी याचे निदान झाले असते तर त्यावर काम करणे सोपे झाले असते. लव्ह मॅरेज असल्यामुळे प्रशांतची बाजू समजणारी पल्लू मिळाली म्हणून आनंदले होते खरे पण लग्नानंतर काही महिन्यातच सगळी चक्रे उलटी फिरू लागली. हळूहळू तिच्याकडून घटस्फोटाची मागणी होऊ लागली. पल्लूचे आई–वडील देखील तिच्या निर्णयामुळे नाराज होते. सगळे समजावून सांगत होते. परंतु ती तिच्या विचारशी पक्की होती. घटस्फोट झाला देखील. पल्लूच्या निर्णयाचे परिणाम निरागस प्रशांतला, त्याच्या आई वडिलांना भोगावे लागले. किती मानसिक ओढाताण झाली असेल? प्रशांतमधील स्वभाव दोष लग्नाआधी ८,९ वर्षे कसा नाही कळला? भातुकलीचा डाव मोडावा तसा डाव मोडताना कसे काही वाटले नसेल? ह्या प्रश्नांची उत्तरे अनुत्तरीतच आहेत.




**–दीप्ती नीरज करंदीकर**
(क्लिनिकल सायकोलॉजिस्ट)




### राशीभविष्य

- **मेष** : उत्साह, धडाडी वाढेल. नव्या योजना मार्गी लागतील. यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृषभ** : आपलंच म्हणणं खरं हा अट्टाहास टाळा. सरकारी कामं रखडतील. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात.
- **मिथुन** : नव्या विचारांना चालना मिळेल. विलंबाने पण चांगली प्रगती साधता येईल. अपेक्षित कामं होतील.
- **कर्क** : योजलेली कामं मनासारखी होतील. उपजत गुणांचा विकास होईल. नोकरीत अधिकार लाभतील.
- **सिंह** : हाती घेतलेल्या कामात यश लाभेल. शिक्षणातून प्रगतीच्या संधी लाभतील. व्यर्थ चिंता करू नये.
- **कन्या** : भागीदारी व्यवसायात अनुकूलता राहील. महत्त्वाच्या कामांना गती मिळेल. समाधानी रहाल.
- **तूळ** : गुंतवणूक विचारानं करावी. नव्या योजना मार्गी लागतील. अडचणीतून वेळीच मार्ग काढता येईल.
- **वृश्चिक** : संतती संबंधात शुभ घटना घडतील. नव्या संधींचा लाभ उठवावा. प्रतिकूलतेवर मात कराल.
- **धनु** : स्पर्धांमध्ये यश मिळेल. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावं. विवाह विषयक कार्यात प्रगती होईल.
- **मकर** : योजलेली कामं विचारपूर्वक करावी. जाणकारांचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. विद्यार्थ्यांना यश मिळेल.
- **कुंभ** : नव्या विचारांना चालना मिळेल. प्रयत्नातील सातत्यातून यश मिळेल. विद्यार्थ्यांना अनुकूलता वाढेल.
- **मीन** : उत्साहवर्धक घटना घडतील. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. चैनीवर अधिक खर्च होईल.

### दिनविशेष

**२२ एप्रिल**

- **२०१५ :** 'आप'च्या सभेत राजस्थानातील गजेंद्रसिंह नावाच्या शेतकऱ्याने गळफास घेतला.
- **२०१६ :** उत्तराखंडमधील राष्ट्रपती राजवट हटवण्याच्या उत्तराखंड उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली.
- **२०१७ :** काँग्रेसमधून निलंबित बरखा शुक्ला सिंह यांचा भाजपमध्ये प्रवेश.
- **२०१८ :** बोरिया जंगल परिसरातील चकमकीत सोळा नक्षलवाद्यांचा खात्मा. मृतांमध्ये तीन नक्षल महिलांचा समावेश.

### आरोग्यमंत्र — चालण्याचे लाभ मिळवा

शरीराला व्यायामाची आवश्यक असते. पायी चालणं हा अत्यंत परिणामकारक व्यायाम असल्याचं तज्ज्ञ सांगतात. नियमीत आणि योग्य त्या वेगानं चालण्याचे तब्बल ३४ फायदे आहेत. त्याविषयी जाणून घेऊ.



- ✻ चालण्यामुळे शरीरातील चरबीचं प्रमाण कमी होतं.
- ✻ दररोज एक तास चालल्यास संधीवाताचा त्रास कमी होतो.
- ✻ चालण्यामुळे पचनक्रिया सुधारते, मलबद्धतेसारखे पचनाचे विकार कमी होतात.
- ✻ झपझप चालण्यामुळे हृदयाची गती वाढते. हृदय निरोगी रहातं.
- ✻ हृदयविकारानं मृत्यू येण्याचं प्रमाण ५० टक्के पेक्षा कमी होतं.
- ✻ फुफ्फुसाची कार्यक्षमता वाढते.
- ✻ पाठीचं दुखणं, हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, श्वासाच्या त्रासावर नियंत्रण मिळवता येतं.
- ✻ चालण्यामुळे हाडांची मजबुती वाढते.
- ✻ कंबर,मांड्या आणि पायाचे स्नायू मजबूत होतात.
- ✻ मोतीबिंदूची शक्यता कमी होते.
- ✻ काही विशिष्ट प्रकारच्या कर्करोगापासून बचाव होतो.
- ✻ रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते.
- ✻ दररोज ३० मिनिटं चालल्यामुळे सरासरी आयुष्य तीन वर्षांनी वाढतं. दीर्घायुष्य वाढते. हे सगळे लाभ केवळ चालण्यामुळे मिळतात.

### महत्त्वपूर्ण काही... — सुरक्षेच्या दृष्टीने...

अँड्रॉइड फोनमध्ये व्हायरसचा हल्ला होण्याची शक्यता अनेक पटींनी वाढली आहे. अशा परिस्थितीत फोनच्या सुरक्षेला महत्त्व द्यायला हवं.

✻ गरज नसताना फोन लॉक करून ठेवा. यासोबतच फोनमध्ये पिन टाकून ठेवायला विसरू नका. ✻ अँड्रॉइड युजर्स फोनची ऑपरेटिंग सिस्टिम अपडेट करत नाहीत. यामुळे फोनला धोका निर्माण होऊ शकतो. म्हणूनच ओएस सतत अपडेट करत रहा. यामुळे व्हायरसचा धोका कमी होईल. ✻ अनेक मोबाईल कंपन्यांच्या फोनमध्ये डेटा सुरक्षित ठेवणारी यंत्रणा सक्षम नसते. अशा कंपन्यांचे फोन घेणं टाळायला हवं. ✻ फोनमधलं स्टोरेज एन्क्रिप्ट करून ठेवा. या डिव्हाइसमध्ये बराच डेटा असतो. त्यामुळेच फोन हरवला किंवा चोरीला गेला तर हा डेटा हॅकर्सच्या हाती लागू शकतो. यासाठी एन्क्रिप्ट करणं गरजेचं आहे. ✻ फोन सतत स्कॅन करत रहा. फोनमध्ये कोणत्या मार्गाने व्हायरस जाईल याचा काहीच नेम नसतो. वेळोवेळी स्कॅनिंग करत राहिल्याने लाभ होऊशकतो. ✻ अँड्रॉइड युजर्सनी फोन वारंवार रूट करू नये. असं केल्याने फोनला धोका निर्माण होऊ शकतो.

### सल्ला मोलाचा — ट्राय व्होल्कॅनिक ॲश

त्वचेच्या देखभालीसाठी विविध उपचारपद्धती वापरल्या जातात. विविध देशांमधल्यासौंदर्यविषयक पद्धती लोकप्रिय होतात. सध्या कोरीयन उपचारपद्धतींनी बरीच प्रसिद्धी मिळवली आहे. आता फेस मास्कसाठी व्होल्कॅनिक ॲशचा वापर होताना दिसत आहे. व्होल्कॅनिक ॲश हा खनिजांनी समृद्ध असलेला मातीसारखा प्रकार आहे. यामुळे त्वचा आतून आणि बाहेरून स्वच्छ होते. त्वचेतलं तेल, धूळ, मळ काढून टाकण्याची क्षमता या ॲशमध्ये असते. ही ॲश जंतूनाशक आहे. विविध उत्पादनांमध्ये तिचा वापर केला जातो. व्होल्कॅनिक ॲश पाण्यामध्ये विरघळत नाही. फेसवॉश, फेस स्क्रब्ज, फेस पॅक्समध्ये याचा वापर केला जातो. तेलकट आणि मुरमं असलेल्या त्वचेसाठी ही ॲश वरदान ठरू शकते. या ॲशचे अनेक लाभ आहेत. फूट आणि बॉडी स्क्रब्जमध्ये तिचा वापर केला जातो. या ॲशमुळे त्वचा शुद्ध होते. जंतूनाशक गुणधर्मामुळे तिचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. अर्थात तुमचं सौंदर्य वाढवण्यासाठीचा हा एक पर्याय आहे. त्यामुळे तुम्ही त्वचेची दैनंदिन काळजी घ्यायला हवी. या ॲशमुळे मृत पेशी दूर होतात आणि त्वचा तजेलदार आणि सतेज दिसते.

### पंचांग

**मंगळवार, २२ एप्रिल २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र कृ. ९, नक्षत्र : श्रवण
चंद्रराशी : मकर , योग : शुभ
सूर्योदय : ६.१९, सूर्यास्त : ६.५६

### फॉरवर्डस

**जिंदगी किस्मत से चलती हैं जनाब...**

**दिमाग से चलती तो बिरबल बादशाह होता ।...**

### स्मार्ट शॉपिंग

उन्हाळ्यात पोटाचे विकार उद्‌भवू शकतात. या दिवसांत आहाराच्या सवयींमध्ये बदल करणं गरजेचं ठरणार आहे. उन्हाळ्यात काळजी कशी घ्यावी याविषयी...

✻ भरपूर पाणी प्यायल्याने ९० टक्के विकारांशी लढण्याची शरीराची क्षमता वाढते. ✻ आहारात फायबरयुक्त घटकांचं प्रमाण वाढवायला हवं. पूर्ण धान्ययुक्त पदार्थ, फळं, भाज्या खाणं गरजेचं आहे. ✻ उन्हाळ्यात चरबीयुक्त आहार टाळायला हवा. चरबीयुक्त पदार्थांमुळे पचनसंस्थेचं कार्य मंदावतं आणि पोटाचे विकार उद्‌भवू शकतात. ✻ या दिवसात चहा आणि कॉफीचं सेवन टाळायला हवं. ✻ उघड्यावरचे पदार्थ खाणं टाळा. बाहेर पडताना पाणी बरोबर ठेवा. ✻ उन्हाळ्यात ताजं अन्न खा.

### करिअरवाटा — अभ्यास करा पर्यावरणाचा

पर्यावरण रक्षणाप्रती सजगता वाढली असून या संदर्भातील उपक्रमांमध्ये तरूणाईचा सहभाग उत्साह वाढवणारा आहे. विशेष म्हणजे या विषयातील उपक्रमांना शासनाचं तसंच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांचं पाठबळ लाभत आहे. त्यामुळे या क्षेत्रात मोठं काम उभं राहत आहे. या क्षेत्रामध्ये कारकिर्द घडवण्याची जिज्ञासा असेल तर 'इकॉलॉजी ॲन्ड एन्व्हायर्नमेंट' या विषयाचे पदविकेपासून पदव्युत्तर पदवीपर्यंत अभ्यासक्रम देशातील विविध महाविद्यालयं आणि विद्यापीठांमधून उपलब्ध आहेत. काही मुक्त विद्यापीठांनी सुरू केलेल्या अशा अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. या विषयाचा बी.एस्सी.चा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून त्यासाठी बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर प्रवेश दिला जातो.



यात इकॉलॉजी, एन्व्हायर्नमेंट, झुऑलॉजी आणि बॉटनी हे विषय शिकवले जातात. एकदा ही पदवी प्राप्त केली की केवळ इकॉलॉजी आणि एन्व्हायर्नमेंट या विषयांना वाहिलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. बी.एस्सी.ची ही पदवी घेणारा विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमात वाईल्ड लाईफ म्हणजे वन्य जीवांचा अभ्यास करू शकतो. अर्थात बी.एस्सी.ला प्रवेश घेताना प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणं आवश्यक असतं.

### खेचाखेची — अविवाहित समस्या

अविवाहिताचं लग्न होत नाही,
विवाहितांना लग्नजीवनात मजा
येत नाही आणि घटस्फोट
झालेल्यांना पुन्हा लग्न करायचं
असतं!
.
.
.
.
यात कोण आनंदी आहे, कळत
नाही!

### वेगळं काही

मध्यंतरी मुंबईतल्या वर्सोवा समुद्रकिनाऱ्यावर ऑलिव्ह रिडले जातीच्या कासवांची पिल्लं जन्मली. किनाऱ्यावर जवळपास ८० पिल्लं आढळली. हे वर्सोवा बीचच्या स्वच्छता मोहिमेचं फळ असल्याचं बोललं जात आहे. किनाऱ्याच्या स्वच्छतेसाठी अनेकांचा हातभार लागला होता. त्यात समाजसेवक अफरोज शाह आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा समावेश आहे. ऑलिव्ह रिडले जातीच्या मादीला वर्सोवा समुद्रकिनारा सुरक्षित वाटला. त्यामुळे तिने इथल्या वाळूमध्ये अंडी घातली. काही काळानंतर ऑलिव्ह रिडलेच्या या पिलांनी समुद्राच्या दिशेने कूच केली. वाळूवर उमटलेल्या या चिमुकल्या पाऊ लांमुळे सगळीकडे आनंदीआनंद पसरला.

### स्टाईल फंडा — हेअर स्टाईल फॉर समर



उन्हाळ्यात मानेवर रुळणारे केस नकोसे वाटतात. म्हणूनच हेअर स्टाईलबाबत वेगळा विचार करुन हटके स्टाईल करणं योग्य ठरतं.

✻ **डबल बन –** उन्हाळ्यासाठी ही परफेक्ट हेअरस्टाईल आहे. यासाठी केसांचं मधोमध पार्टीशन करावं. त्यानंतर दोन वेगवेगळे बन करावेत. हेअर पिन्सच्या साह्याने सेट करावेत. ✻ **हाफ बन –** सध्या ट्रेंडमध्ये असणारी ही हेअरस्टाईल आहे. हाफ बन घालताना सर्वप्रथम केसांच्या मधला भाग घेऊन आंबाडा घाला. उरलेले केस मोकळे ठेवा. कॅज्युअल आऊटफिटवर ही हेअरस्टाईल खुलून दिसते. ✻ **हाय बन –** सगळे केस एकत्र करून क्राऊन एरियावर बांधणं म्हणजे हाय बन घालणं. साडीसारख्या पारंपरिक प्रावरणांवर ही हेअरस्टाईल छान दिसते. ✻ **साईड बन –** एखाद्या कॉर्पोरेट पार्टीसाठी ही हेअरस्टाईल परफेक्ट ठरते. यासाठी सगळे केस डाव्या अथवा उजव्या बाजूला बांधावेत. एका बाजूचा हा आंबाडा वेगळा लूक देतो ✻ **लो बन –** ही स्टाईल करण्यासाठी केसांचं पार्टीशन करून घ्यावं. मानेलगत आंबाडा घालावा. हा आंबाडा फुलवता येतो. बाजूने गजरा गुंडाळल्यास बन आणखी सुंदर दिसतो.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा–अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा– अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक– स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी– २३४५२७०, २३४७०८६, मो.– ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

## अर्ज़ किया है...

*कोई हाथ भी न मिलाएगा जो गले मिलोगे तपाक से,*
*ये नए मिज़ाज का शहर है, ज़रा फ़ासले से मिला करो।*

**- बशीर बद्र**

समाजातील बदललेल्या स्वभावावर भाष्य करतो आहे. पूर्वी माणसे प्रेमाने, आपुलकीने भेटायची पण आता हे चित्र जरा बदललं दिसतं . जर आपण एखाद्या बरोबर खूप प्रेमाने जवळीक साधतो, पण बऱ्याचदा लोक याचा चुकीचा अर्थ घेतात. त्यामुळे या 'नव्या मिजाजा'च्या शहरात - थोडा 'फ़ासला' ठेवून म्हणजेच जरा अंतर ठेवून शहाणपणानं वागायला हवं, असं शायर सूचित करतात.



# समाचार

सोमवार, दि. २१ एप्रिल २०२५ पान ३


### पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे पोलिस यंत्रणेला निर्देश

# जिल्ह्यात अवैध धंद्याविरोधात निर्भयपणे मोहीम राबवा

**समाचार/नगर-दि.२७**

नगर - जिल्ह्यातील अवैध धंद्याविरोधात पोलिसांनी निर्भयपणे कडक मोहीम राबवावी, असे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी पोलिस यंत्रणेला दिले. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास आणि कायदा सुव्यवस्थेचे वातावरण कायम ठेवण्यासाठी अवैध धंद्याविरुद्ध ही कारवाई होणे आवश्यक असून त्यामध्ये पोलिस यंत्रणेला शासनाचे पूर्णपणे सहकार्य राहील, अशी ग्वाही ना. विखे यांनी यावेळी दिली.



जिल्हाधिकारी कार्यालयात अवैध व्यवसायांवर कारवाईबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीसाठी आमदार सर्वश्री काशिनाथ दाते, अमोल खताळ, विठ्ठलराव लंघे, विक्रम पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे आणि वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री विखे म्हणाले, अंमली पदार्थांची विक्री करणारांवर कठोरपणे कारवाई करावी. अवैध शस्त्रे आणि गुटखा विक्रीलाही पायबंद घालण्यासाठी मोहीमस्तरावर कारवाई करावी. काळ्या काचा लावलेल्या वाहनांवर जप्तीची कारवाई करावी. लहान अक्षरातील नंबर प्लेट लावलेल्या वाहनांवरदेखील दंडात्मक कारवाई करावी. जिल्ह्यात कोणताही अवैध व्यवसाय सुरु राहणार नाही याची दक्षता घ्यावी, शासनाचे पोलिस दलाला या कारवाईत पूर्णपणे सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि कायदा व सुव्यवस्थेचे वातावरण राखण्यासाठी अशी कारवाई गरजेची असल्याचे विखे म्हणाले.

### शहर मंडल अध्यक्षपदी सैफ काशिद

## भाजपाच्या जामखेड तालुकाध्यक्षपदी ढवळे

**समाचार/जामखेड-दि.२१**

भाजपच्या जामखेड तालुकाध्यक्षपदी (ग्रामीण मंडल) बापूराव ढवळे तर शहर मंडल अध्यक्षपदी संजय काशिद यांची निवड झाली आहे. नवनियुक्त दोन्ही अध्यक्ष विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे कट्टर समर्थक आहेत. ढवळे पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते तसेच पिंपरखेड ग्रामपंचायतचे सरपंच होते तर त्यांच्या पत्नी सलग दोन वेळा सरपंच होत्या तर संजय काशिद सलग दहा वर्षे शिवसेना (उबाठा) गटाचे अध्यक्ष होते.





जामखेड शहर व ग्रामीण असे दोन तालुकाध्यक्ष नियुक्ती करण्याची प्रथा यावेळी करण्यात आली आहे. पंधरा दिवसांपूर्वी जामखेड शहर व ग्रामीण अध्यक्षपदासाठी पक्षीनिरीक्षकांच्या उपस्थित मुलाखती घेण्यात आल्या होत्या. व एकावेळी राज्यातील सर्व तालुक्यातील शहर व ग्रामीण निवडी प्रदेश कार्यालयातून जाहीर झाल्या आहेत.

जामखेड तालुक्यात दोन मंडल आहेत तसेच १४३ बुथ आहेत. जामखेड शहर व सात वाड्या मिळून तीस बुथाचे एक मंडळ तर ग्रामीण भागाचे ११३ बुथचे एक मंडल आहे. आता तालुकाध्यक्ष संपुर्ण तालुक्याची कार्यकारीणी तयार करतील तर शहर मंडलाध्यक्ष हे शहराची कार्यकारीणी तयार करतील. शहर मंडल अध्यक्ष संजय काशिद विधानसभा निवडणुकीच्या अगोदर जामखेड शिवसेना (उबाठा) तालुकाप्रमुख म्हणून संजय काशिद सलग दहा वर्षे अध्यक्ष होते. विधानसभा निवडणुकीच्या अगोदर त्यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह मुंबई येथे देवेंद्र फडणवीस व प्रा राम शिंदे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. ते सभापती प्रा राम शिंदे यांचे विश्वासू म्हणून ओळखले जातात. निवडणुकीनंतर भाजपने संघटनात्मक बांधणीवर लक्ष दिले आहे. नव्या दमाच्या अभ्यासू आणि संघटनात्मक कौशल्य असलेल्या नेत्यांच्या खांद्यावर नव्या जबाबदाऱ्या देऊन तालुक्यात पक्ष संघटन मजबुत करण्यावर भाजपने जोर दिला असल्याचे या निवडीतून स्पष्ट होत आहे.

## हिवरे बाजार येथे उद्या मुंबादेवीचा यात्रौत्सव

**समाचार/नगर-दि.२१**

आदर्श गाव हिवरे बाजार येथे ग्रामदैवत मुंबादेवी मातेची यात्रा मंगळवार दि. २२ एप्रिल रोजी असून यात्रेनिमित्त बुधवार दि. २३ एप्रिल रोजी सकाळी १०.३० ते २.३० या वेळेत कुस्त्यांच्या जंगी आखाड्याचे आयोजन करण्यात आले आहे. कुस्त्यांचे उद्घाटन पद्मश्री डॉ.पोपटराव पवार यांच्या हस्ते होणार आहे.

हिवरे बाजार गावाला कुस्तीची मोठी परंपरा असून ती कायमस्वरूपी चालत राहण्यासाठी पोपटराव पवार यांच्या संकल्पनेतून जुन्या पैलवानाच्या स्मृतीप्रीत्यर्थ विविध कुस्त्या लावण्यात आल्या आहेत. एकेकाळी प्रती कोल्हापूर म्हणून ओळखले जाणारे हिवरे बाजार तसेच महान भारत केसरी मास्टर चंदगीराम, हिंदकेसरी मारुती माने, हिंदकेसरी दिनानाथ सिंह, हिंदकेसरी हरिश्चंद्र बिराजदार, हिंदकेसरी गणपत आंधळकर, हिंदकेसरी महमद हनीफ, हिंदकेसरी संतोष वेताळ, हिंदकेसरी रोहित पटेल, महाराष्ट्र केसरी रघुनाथ पवार, महाराष्ट्र केसरी गुलाब बर्डे, महाराष्ट्र केसरी अशोक शिर्के, महाराष्ट्र केसरी नरसिंह यादव, महाराष्ट्र केसरी हिरामण बनकर यांनी भेटी दिलेला व बागुजी पवार, बाबासाहेब पवार, ज्ञानदेव ठाणगे, विश्वनाथ पादीर, अर्जुन ठाणगे,पै.मंड्याबापू चत्तर, रावसाहेब पवार, रतन गोहड, नामदेव पादीर, बाळाजी पवार, बापूराव पादीर, पोपट भालेकर, पाराजी गिर्हे, , महीपत गिर्हे,लक्ष्मण पवार, जालिंदर चत्तर, पांडुरंग कदम, विठोबा चारुडे, गोरख चत्तर यांचा कुस्तीचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. लक्ष्मण पवार, जालिंदर चत्तर, नामदेव ठाणगे या तीन पहीलवानांनी सलग १२ -१२ वर्षे आपल्या वजनगटात राज्यात कुस्ती क्षेत्रात प्रथम क्रमांक मिळवून राज्य शासनाचे सलग १२ वर्षे मानधन मिळत होते.

परिसरातील नामवंत मल्लांनी आणि कुस्तीशौकीनांनी हजर राहण्याचे आवाहन पोपटराव पवार, सरपंच विमल ठाणगे,चेअरमन छबूराव ठाणगे,व्हा चेअरमन जालिंदर चत्तर,बाबासाहेब गुंजाळ तसेच हिवरे बाजार ग्रामस्थातर्फे करण्यात आले आहे.

## केडगाव देवी परिसरात तीन चोऱ्या

**समाचार/नगर-दि.२१**

केडगाव देवी परिसरात तीन ठिकाणी चोरट्यांनी घरात चोऱ्या करत सोन्या चांदीचे दागिने, रोख रक्कम व इतर साहित्य चोरून नेले. १७ एप्रिल ते १९ एप्रिल दरम्यान ही घटना घडली. या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमितनगर, एकता कॉलनी व धनश्री कॉलनी येथे या घटना घडल्या. संगीता आसाराम भताने (वय ४०, रा. अमितनगर, केडगावदेवी) यांनी फिर्याद दिली आहे. चोरट्यांनी अमितनगर येथे एका घरातून १० ग्रॅम सोन्याचे दागिने, ६५ ग्रॅमच्या चांदीच्या वस्तू, ५ हजारांची रोकड असा २९ हजारांचा ऐवज लंपास केला. त्यानंतर एकता कॉलनी येथे एका घरातून १४० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने चोरून नेले. तसेच, धनश्री कॉलनी येथील घरातून चांदीची मूर्ती, कॉइन, मलेशियन चलनी नोटा, स्मार्ट वॉच, दोन घड्याळ, साऊंड बार, साडेतीन हजार रुपये रोख असा १४ हजारांचा ऐवज लंपास केला. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक आनंद कोकरे, उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी घटनास्थळी भेट दिली. अधिक तपास पोहेकॉ सोनवणे करत आहेत.

## फिरोदिया प्रशालेचा सैफ शेख प्रज्ञाशोध परीक्षेत दुसरा

**समाचार/नगर-दि.२१**

मंथन प्रज्ञाशोध परीक्षा २०२५ यांच्या मार्फत घेतल्या जाणार्याक प्रज्ञाशोध परीक्षेत सविता रमेश फिरोदिया प्रशालेतील विद्यार्थी शेख सैफ आसिफ राज्यात दुसरा आला असून एकूण २८ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत.



राज्यात दुसरा आलेला शेख सैफ आसिफ हा इयत्ता दुसरीचा विद्यार्थी असून तसेच इ.दुसरी मधील कार्तिक घोलप जिल्ह्यात ३ रा, अर्णव मनोजकुमार खंडागळे, धनश्री विकास पाचारणे, पुष्कराज किरण गायकवाड हे जिल्ह्यात चौथे आले असून तर इ.७ वीतील ओम श्रीराम मंडलीक जिल्ह्यात दुसरा आला आहे. सर्व गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र.धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार अ‍ॅड. विजय मुनोत, विनोदकुमार कटारिया तसेच सर्व विश्वरस्त, संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापिका योगिता गांधी व सर्व शिक्षकवृंद, पालक यांनी अभिनंदन केले.



## दादा चौधरी विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**समाचार/नगर-दि.२१**

येथील हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालय नं. १ च्या सन १९६९ चे एस.एस. सी. बॅचमधील सर्व माजी विद्यार्थी (सिनिअर सिटीझन) यांच्या वतीने तिसरा स्नेहसंमेलन मेळावा दि. १८ एप्रिल रोजी नगर-पुणे रोडवरील हॉटेल स्वीटहोम येथे आयोजित करण्यात आला होता.

मेळाव्यात औरंगाबाद, नाशिक, पुणे, नगर येथील एकूण ४५ विद्यार्थी/सिनिअर सिटीझन यांनी सहभाग घेवून आपल्या सर्व जुने मित्रांना भेटून एकमेकांच्या आयुष्यातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. स्नेहसंमेलन पार पाडण्यासाठी शहरातील रामशेठ पर्बते, दिलीपसिंग परदेशी, दिलीप बोरुडे, श्रीकांत खाजगीवाले, नंदु तारे, माजी नगरसेवक दत्तात्रय भागानगरे, हॉटेल सायंतराचे मालक श्रीकांत अष्टेकर, शरद गोडबोले, बाळू पाटील यांनी सहकार्य केले. सर्व सिनिअर सिटीझन यांच्या अविस्मरणिय सहभागाबद्दल टॉफी देण्यात येऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन अ‍ॅड. सुधीर झरकर यांनी केले.

# महापालिकेतील तांत्रिक पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा

**समाचार/नगर-दि.२१**



महापालिकेतील तांत्रिक पदांच्या भरतीची प्रक्रिया मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. आर्थिक अडचणींमुळे प्रशासनाने १३० पदांना कात्री लावत केवळ ४५ तांत्रिक पदे भरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सामाजिक आरक्षण निश्चितीसाठी पाठवलेला प्रस्ताव नाशिकहून मान्यतेसह महापालिकेला प्राप्त झाला आहे. आता महापालिका स्तरावर खेळाडू, दिव्यांग अशा समांतर आरक्षणाच्या निश्चितीची प्रक्रिया होऊन प्रत्यक्ष भरतीची प्रक्रिया सुरू होणार आहे.

महापालिकेतील तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्याने महापालिकेने तांत्रिक पदांच्या भरतीसाठी आस्थापना खर्चाची अट शिथिल करून परवानगी द्यावी, असा प्रस्ताव नगर विकास खात्याकडे पाठवला होता. त्याला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी देत १७६ पदे भरण्याचा प्रस्ताव मंजूर केला. त्यानंतर महापालिकेने १३४ तांत्रिक पदे भरण्याबाबत प्रक्रिया सुरू केली. दरम्यानच्या काळात सातवा वेतन आयोग लागू झाल्यामुळे महापालिकेच्या आस्थापना खर्चात पुन्हा एकदा वाढ झाली. पगाराचा खर्च दरमहा दोन कोटींनी वाढल्याने महापालिकेने या पदभरतीला कात्री लावत अत्यावश्यक असलेली केवळ ४५ तांत्रिक पदे भरण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सामाजिक आरक्षण निश्चितीचा प्रस्ताव तयार करून नाशिक येथे पाठवण्यात आला होता. त्याला मंजुरी मिळाली आहे.

आता समांतर आरक्षण निश्चितीसाठी प्रक्रिया सुरू आहे. ती झाल्यानंतर भरती प्रक्रियेसाठी टाटा कन्सल्टन्सी या शासनाने नियुक्त केलेल्या संस्थेकडे प्रस्ताव दिला जाणार आहे. त्यामुळे लवकरच भरती प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

## पान १ वरुन

### जुन्या व भंगार वाहनांचा रस्त्यावरच ठिय्या

आयुक्त यशवंत डांगे यांनी यासंबंधी कारवाईचे आदेश दिले होते. महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २३० व २३१ अंतर्गत सदर वाहने बेवारस समजून ती तत्काळ जप्त करण्याचे आदेश त्यांनी दिले होते. मात्र, या आदेशाला संबंधीत विभागाने हरताळ फासला असल्याचे दिसत आहे. हल्ली वाहन ही प्रत्येकाची गरज बनली आहे. त्यामुळे घरोघरी आणि बहुतांश नागरिकांकडे किमान मोटारसायकल तरी असते. कार व तत्सम वाहने खरेदी करण्याचे प्रमाणही वाढले आहे. परंतु, ही वाहने जुनी झाली की कालांतराने अनेकदा नादुरुस्तदेखील होतात. अशा वाहनांची जागा मग नवीन वाहने घेतात. त्यामुळे जुन्या वाहनांना सांभाळायचे कसे? असा प्रश्नही उपस्थित होतो. ती उभी करण्यासाठी वाहन मालकांकडे पुरेशी जागाही नसते. अशा वाहनांसाठी सार्वजनिक रस्तेच आधार ठरू लागले आहेत. नादुरुस्त वाहनांचे इंजिन काम करीत नसले तरी त्यामधील अन्य स्पेअर पार्टस मात्र उपयुक्त असतात. म्हणूनच अशी वाहने सरसकट भंगार जमा करण्याऐवजी ती रस्त्यांवरच उभी करून त्यावर येता जाता लक्ष ठेवण्याचे प्रकारही निदर्शनास येऊ लागले आहेत.सर्वच प्रकारची अनेक वाहने शहरातील रस्त्यांवर महिनो- महिने बेवारस अवस्थेत पहावयास मिळतात. त्यामुळे वाहतुकीच्या समस्येलाही हातभार लागतो आहे.

### हिंदी भाषेला विरोध करतो अन् इंग्रजीचे गोडवे गातो

अनिवार्य आहे. त्यापैकी दोन भाषा भारतीय असल्या पाहिजेत, असा नियम आहे. या दोन भाषामध्ये मराठी भाषा आपण आधीपासूनच सक्तीची केली आहे. दुसरी कोणती भाषा घेतली तर हिंदी, तमिळ, मल्याळम घ्यावी लागेल. याबाहेरची भाषा घेता येणार नाही. कुणाला हिंदीव्यतिरिक्त तिसरी भाषा शिकायची असेल तर तशी मुभा दिली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### मनपाच्या कामकाजात गतिमानता

परिणामकारक झाली आहे. सर्व विभागप्रमुखांना दिवसभरात आलेल्या फायली त्याचदिवशी संध्याकाळी निकाली काढणे, मंजुरी देणे, आवश्यक कार्यवाही करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामध्ये हलगर्जीपणा झाल्यास कारवाई केली जात आहे. प्रशासनाचा कारभार नागरिकाभिमुख असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने लवकरच नागरिकांच्या तक्रारी, सूचना व विविध सुविधा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्याचे नियोजन सुरू आहे. सध्या, महापालिकेच्या अधिकृत फेसबुक व इन्स्टाग्राम पेजवर नागरिकांनी नोंदवलेल्या तक्रारींची दखल घेऊन त्यावर कार्यवाही केली जात आहे. आता नागरिकांचे काम अधिक सोयीस्कर, सुखकर होण्यासाठी महापालिका प्रशासनाने १०० टक्के डिजिटल प्रणालीचा वापर सुरू करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या दिशेने प्रक्रिया सुरू आहे, असेही त्यांनी सांगितले.

### सद्‌भावना पॅनलचा दणदणीत विजय



विजयी मिरवणूक काढण्यात आली. प्रचाराचा नारळ फोडलेल्या या मंदिरात विजयोत्सव साजरा करताना सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्रीगोपालजी धूत म्हणाले, मला प्रकृतीमुळे सर्व सभासदांपर्यंत पोहोचता आले नाही तरीही सभासदांनी आपलेपणाने भरभरून मतांचे दान देत विश्वास व्यक्त केला याबद्दल सभासदांचा ऋणी आहे. सोसायटीचे कामकाज यापुढेही सभासद हितास प्राधान्य देत असेच पारदर्शीपणे चालेल. आपल्या सर्वांच्या सहकार्याने सोसायटी प्रगतीपथावरच राहिल. सद्‌भावना पॅनलच्या पाच जागा मतदानाअगोदरच बिनविरोध झाल्या होत्या. सर्वसाधारण मतदारसंघातून सद्‌भावना पॅनलच्या १५ उमेदवारांनी निवडणूक लढवली. सर्वच्या सर्व उमेदवार विजयी झाले. त्यांना मिळालेली मते अशी :- श्रीगोपाल धूत (८८३), अनुराग धूत (८३६), लक्ष्मीकांत झंवर (८०५), राजेंद्र मालू (८०२), किसनलाल बंग (७९९), प्रकाश गांधी (७९५), राजेंद्र गुजराथी (७८९), सुधीर झालानी (७८३), विश्वनाथ कासट (७७७), गोपाल मणियार (७५७), प्रदिप पंजाबी (७४०), अ‍ॅड.अशोक बंग (७२४), ओमप्रकाश चांडक (७२०), मधुसुदन सारडा (७१९) आणि राजेंद्रकुमार कंत्रोड (६५५), विरोधी पराभूत झालेले उमेदवार व त्यांना मिळालेली मते :- विष्णू सारडा (४६८), जगदिश दरक (३६८), सुनिल मुंदडा (३३२). सद्‌भावना पॅनलमधील राजकमल मणियार व शोभा राठी या महिला राखीव मतदार संघामधून साईनाथ कावट हे विमुक्त जाती व भटक्या जमाती मतदार संघामधून अनुरिता झगडे या इतर मागासवर्गीय विभागामधून तर देवराव साठे हे अनुसूचित जाती/जमाती विभागामधून बिनविरोध निवडून आले.

## निधन वार्ता

### नामदेवराव कोके

**समाचार/नगर-दि.२१**



नगरचे रहिवासी नामदेव कोके यांचे नुकतेच निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८५ होते त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, नातु, नाती असा परिवार आहे. ते प्रसाद हॉटेलचे संचालक विनायक कोके यांचे वडील होते.

### रमाकांत मुळे

**समाचार/नगर-दि.२१**



रमाकांत मुरलीधर मुळे यांचे दि.१९ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता निधन झाले. त्यांच्या मागे ३ मुली ,२मुले,सुना व नातवंडे,पणती,पणतू असा परिवार आहे


**समाचार**
**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## मुंबई शेअर भाव

**सोने महागले-चौफेर खरेदी**
**सेन्सेक्समध्ये ९०० अंकांनी वाढ**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक २१-०४-२०२५**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७९५०६ |
| एसीसी | २०८५-८६ |
| एशियन पेंट | २४५१-५२ |
| बजाज ऑटो लि. | ८२२८-२९ |
| बलराम फूड चिनी | ५६५-६६ |
| भारत फोर्ज | १०९६-९७ |
| क्रॉम्प्टन | ३३६-३७ |
| डीएलएफ | ६७८-७९ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ११७०-७१ |
| ग्रॅफाईट इंडिया | ४८६-८७ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २३५४-५५ |
| आयटीसी लि. | ४२२-२३ |
| एल अ‍ॅण्ड टी लि. | ३२८५-८६ |
| रिलायन्स इंड. | १२९४-९५ |
| एसबीआय | ६१८-१९ |
| टाटा मोटर्स | ६२९-३० |
| टाटा स्टील | १३९-४० |
| टीसीएस | ३३२४-२५ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | १७६-७७ |
| सुवेन फार्मा | ११८३-८४ |

# गीत रामायणामुळे नगरकर रामनामात चिंब

समाचार/नगर-दि.२१

कवी बा. भ. बोरकर असे लिहितात की या भाग्यशाली देशात ईश्वलरच वारंवार अवतार घेतो असे नाही तर त्याचे चरित्र देखील युग धर्माला अनुकूल असा अवतार घेत असते.

पुणे आकाशवाणी केंद्राचे कल्पक कार्यक्रम अधिकारी सीताकांत लाड, सुबोध शब्दसौष्ठव जात्याच लाभलेले प्रतिभावान कवी, गीतकार ग दि माडगूळकर आणि अतिशय शिस्तबद्ध संयमी, शास्त्रीय संगीताची उत्तम जाण असणारे संगीतकार आणि उत्तम गायक स्वरतीर्थ सुधीर फडके अर्थात बाबुजी या त्रयिंच्या हातून घडलेलं गीतरामायण हे याचं मूर्तिमंत उदाहरण आहे.



महर्षी वाल्मिकींचं रामायण आधी लिहिलं गेलं आणि मग गायलं गेलं पण हे गीत रामायण गात गातच जन्माला आलं, गात गातच वाढलं आणि गात गातच परिणामाला आलं. गीत रामायण जन्माला येऊन सत्तर वर्ष झाले पण अजूनही गीत रामायणाची गोडी अजिबात ओसरलेली नाही याचाच प्रत्यय नगरकरांना आला. प्रसाद शेटे यांनी आयोजित केलेल्या गीतरामायण कार्यक्रमामुळे नगरकर रसिक रामनामात न्हावून निघाले.

माऊली सभागृहात रामभाव ग्रहण करण्यासाठी आलेल्या अनंत भाविकांच्या उपस्थितीत गीत रामायण सोहळा रंगला. स्वरतीर्थ सुधीर फडके यांच्या आवाजाची जात कुळी लाभलेले प्रसाद शेटे यांच्या संकल्पनेतून आणि यांच्या आवाजातून गीत रामायण सादर झाले. प्रसाद शेटे यांच्या कन्या श्रद्धा बाजारे आणि नगरमधील रेणुका संतोष पवार यासह गायिकांनी अतिशय मधुर आर्त स्वरात महाराणी कौशल्या आणि सीतेच्या तोंडची गाणी सादर केली.

दीपप्रज्वलन कुमुदिनी बोपर्डीकर, गुरूभागिनी ह.भ.प. कोळी, सांगीतिक गुरू पवन नाईक, धनेश बोगावत, अन्वर भाई आत्तार आणि सर्व प्रायोजक यांचे हस्ते झाले.

# उद्धव शिवसेनेतर्फे निकम, पांढरे यांचा सत्कार

समाचार/नगर-दि.२१

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रणित भारतीय कामगार सेनेच्या (बीकेएस) सहचिटणीस पदी मधुकर निकम यांची निवड झाली आहे. बँक ऑफ इंडियाच्या प्रोबेशनरी अधिकारीपदी हर्षदा पांढरे यांची निवड झाली आहे. याबद्दल अहिल्यानगर शहर शिवसेना ठाकरे पक्षाच्या वतीने शहर प्रमुख किरण काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख रावजी नांगरे यांच्या पुढाकारातून प्रभाग क्र.१ येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अल्पसंख्यांक काँग्रेस आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष अनिस चूडीवाला, शिवसेनेचे कामगार नेते विलास उबाळे, मोहन पांढरे, कल्पना पांढरे, किशोर कोतकर, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, आनंद जवंजाळ आदी उपस्थित होते.

बीकेएस ही राष्ट्रीय पातळीवर काम करणारी कामगारांची मोठी संघटना आहे. अहिल्यानगर शहरामध्ये पूर्वीची एल अँड टी आणि आत्ताची स्नायडर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मल्टि नॅशनल कंपनीमध्ये तसेच कायनेटिक कंपनीत बीकेएसची युनियन आहे. निकम



यांनी बीकेएस संघटनेसाठी गेल्या अनेक वर्षांपासून दिलेल्या भरीव योगदानाबद्दल संघटनेच्या मोठ्या पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. बँकिंग क्षेत्रामध्ये आयबीपीएस या अवघड समजल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेमध्ये हर्षदा पांढरे हीने दैदिप्यमान यश मिळवले आहे.

किरण काळे म्हणाले, बीकेएस ही शिवसेना परिवाराचा घटक आहे. सन १९६८ पासून कामगारांच्या न्याय हक्कांसाठी ही संघटना हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेतून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, बीकेएसचे अध्यक्ष खा. अरविंद सावंत यांच्या नेतृत्वाखाली काम करत आहे.

अहिल्यानगर मधील बीकेएस संघटनेच्या पाठीशी शहर शिवसेना ठामपणे उभी आहे. रावजी नांगरे यांचेही भाषण झाले.

# नगरमध्ये २६ पासून श्रीकृष्ण लीला कथा वाचन कार्यक्रम




समाचार/नगर-दि.२१

केडगाव भूषण नगर या ठिकाणी शिवसेना संपर्कप्रमुख दिलीप सातपुते मित्र मंडळाच्या वतीने श्रीकृष्ण लीला कथा वाचन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वैराग्यमूर्ती केशव महाराज उखळीकर यांच्या सुश्राव्यवाणीतून हा कार्यक्रम संपन्न होणार असून शनिवार दि.२६ एप्रिल ते शुक्रवार दि. ९ मे या कालावधीत सायंकाळी सहा ते नऊ या वेळेमध्ये हा कार्यक्रम पार पडणार असून दररोज महाआरतीनंतर महाप्रसादाचा वाटप होणार आहे.

या कार्यक्रमाच्या मंडप उभारणीच्या भूमिपूजनाचा शुभारंभ पार पडला. यावेळी ह भ प शिर्के महाराज, माऊली महाराज सातपुते, घोडके गुरुजी, ह भ प जाधव, महाराज ह भ प तांदळे महाराज, रामेश्वर भोकर, प्रतीक्षा कोरगावकर, धनश्री शिंदे, डॉक्टर चेमटे, राजू भंडारी, अभय विभूते, अशोक लाटे,ओंकार सातपुते यासह दिलीप दादा मित्र मंडळाचे पद अधिकारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

संपर्क प्रमुख दिलीप सातपुते म्हणाले की, कथा वाचन हा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नाही, तर तो एक अध्यात्मिक प्रवास आहे. या कथांमधून आपल्याला नीतिमूल्यं, भक्तीचा अर्थ, आणि जीवनातील अडचणींवर मात करण्याची प्रेरणा मिळते. श्रीकृष्णांनी गीतेत सांगितलेली कर्मयोगाची शिकवण आजही प्रत्येकासाठी उपयुक्त आहे. या कार्यक्रमामुळे आपल्याला आपल्या परंपरांशी नाते जपता येते, तसेच नव्या पिढीलाही आपल्या संस्कृतीची ओळख करून देता येते. याउद्देशानेच केडगाव, उपनगरासह अहिल्यानगर शहरातील नागरिकांना श्रीकृष्ण लीला कथा वाचनातून प्रभू श्रीकृष्ण काय होते हे कळवे म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# थोपटेंचे पक्षांतर भाजपाला बोनस

समाचार/पुणे-दि.२१


माजी आमदार, काँग्रेसचे जिल्ह्यातील वजनदार नेते संग्राम अनंतराव थोपटे यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय जाहीर केल्याने ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा प्रभाव असलेल्या पुणे जिल्ह्यात भाजपला एक दमदार नेता मिळाला असून, भाजपसाठी हा बोनस आहे.

पुणे जिल्ह्यात माजी आमदार बाळा भेगडे, बाबुराव पाचर्णे असे नेते भाजपकडे आहेत. गेल्या दहा वर्षात दौंडचे आमदार राहुल कुल भाजपकडे आले. भाजपचे जिल्ह्यात बळ वाढले. दरम्यान, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे ही भाजपवासी झाले. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचा कल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बाजूने दिसल्याने हर्षवर्धन पाटील नाराज होऊन शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेले. हा जमा खर्च भाजपसाठी चालू राहिला. त्याच पार्श्वभूमीवर संग्राम थोपटे भाजपमध्ये येत आहेत, हे भाजपसाठी महत्त्वाचे आहे.

थोपटे यांचा भोर मतदारसंघ हा लोकसभेच्या बारामती मतदारसंघात येतो. ही भौगोलिक परिस्थिती लक्षात घेतली तरी, थोपटे यांचे भाजपत येणं महत्त्वाचे ठरते. भोर शहरात भाजपचा सहानुभूतीदार वर्ग मोठा आहे.

ग्रामीण भागात सहकारी संस्थांच्या मदतीने थोपटे यांचे नेटवर्क आहे. आता हे नेटवर्क भाजपसाठी उपलब्ध होणार आहे. थोपटे यांच्या नेतृत्वाखाली राजगड सहकारी साखर कारखाना चालविला जातो. हा कारखाना गेल्या दहा वर्षात जेव्हा जेव्हा अडचणीत आला, तेव्हा तेव्हा मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थोपटे यांच्या पाठिशी ताकद उभी केली आहे. फडणवीस आणि थोपटे यांचे ट्युनिंग चांगले आहे. त्यामुळे फडणवीस यांच्या भाजपकडे थोपटे यांचा ओढा असणे नॅचनल समजले जाते.

पुणे अंतरंग



राजेंद्र पंढरपुरे

१९७२ सालापासून अनंतराव थोपटे आणि त्यानंतर संग्राम थोपटे यांनी इथे आमदार म्हणून काम केले आहे. अनंतराव अनेक वर्ष राज्यात मंत्री होते. १९९९ सालच्या सुमारास काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी थोपटे यांच्या प्रचारासाठी भोरमध्ये आल्या होत्या. भावी मुख्य मंत्री म्हणून थोपटे यांच्याकडे पाहिले जात होते. पण, त्यात त्यांचा पराभव झाला. त्यानंतर ते राजकारणातून बाजूला झाले. २००९ पासून सलग तीन वेळा त्यांचे चिरंजीव संग्राम थोपटे भोरमध्ये तीन वेळा आमदार झाले. २४ च्या निवडणुकीत अजित पवार यांच्या पक्षाच्या उमेदवाराकडून ते पराभूत झाले.

थोपटे यांचा भाजपशी घरोबा होत असला तरी, अजित पवार समर्थकांशी त्यांचे कसे जमेल? हा प्रश्न असून, तो संघर्ष विकोपाला जावू नये, यासाठी फडणवीस हे थोपटे यांचे मोठे पद देऊन त्यांचे राजकीय पुनर्वसन करतील अशी अपेक्षा आहे.

# जीटीटी डेटा च्या हॅकेथॉनद्वारे विद्यार्थ्यांना कौशल्ये आणि नोकऱ्यांची संधी




जीटीटी डेटा सोल्युशन्स लिमिटेड ही बीएसई-सूचीबद्ध, तंत्रज्ञान-आधारित व्यवसाय सोल्युशन्स पुरवणारी कंपनी आहे, जी मध्यम आकाराच्या कंपन्यांना एआय-चालित इ आर पि आणि डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन टूल्सच्या माध्यमातून सक्षम बनविण्यावर लक्ष केंद्रित करते. भारताच्या उदयोन्मुख टेक्नोलॉजी हब्सकडे लक्ष वेधण्यासाठी, जीटीटी डेटा सोल्युशन्स वेस्टर्न महाराष्ट्रात आतापर्यंत झालेल्या सर्वात मोठ्या इंटरकॉलेजिएट हॅकेथॉनपैकी एकाचे आयोजन करत आहे - Code & Compete & Conquer या थीमखाली आयोजित एक ऐतिहासिक सोलो कोडिंग स्पर्धा आहे.

सांगली येथे होणाऱ्या या स्पर्धेत सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि सातारा यासह नऊ जिल्ह्यांतील ७५ कॉलेजमधून १,५०० हून अधिक विद्यार्थी सहभागी होत आहेत - पारंपरिक टेक रिक्रूटमेंटमध्ये दुर्लक्षित राहणाऱ्या टियर २ आणि टियर ३ शहरांतील अपार आणि सुप्त कौशल्यांचा ठसा उमटवण्यासाठी ही अनोखी संधी आहे. कौशल्ये आणि प्रत्यक्ष जगातील संधी यामधील अंतर कमी करण्यासाठी हा हॅकेथॉन डिझाइन करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण विचार, समस्यांचे वास्तववादी निराकरण आणि इंडस्ट्री-ओरिएंटेड कोडिंगसाठी प्रोत्साहित केले जात आहे. विजेत्यांना GTT कडून थेट नोकरीच्या संधी, इंडस्ट्री-मान्यताप्राप्त प्रमाणपत्रे, विशेष प्रशिक्षण प्रोग्राम्स आणि बरेच काही मिळणार आहे.ही फक्त एक स्पर्धा नाही - ही भारताच्या लपलेल्या टेक टॅलेंटला जागतिक व्यासपीठावर आणण्याची आणि नाविन्यपूर्ण विचारांचे विकेंद्रीकरण करण्याची मोहीम आहे.

# आशिष सराफ आरटीएक्सचा प्रॅट अँड व्हिटनी व्हाईस प्रेसिडेंट म्हणून नियुक्त



आरटीएक्सचा व्यवसाय असलेल्या प्रॅट अँड व्हिटनीने आज भारतातील प्रॅट अँड व्हिटनीचे व्हाईस प्रेसिडेंट आणि कंट्री हेड पदावर आशिष सराफ यांची नियुक्ती केल्याचे घोषित केले.प्रॅट अँड व्हिटनीचे सर्वात वरिष्ठ इन-कंट्री लीडर या नात्याने आशिष भारतातील सर्व प्रकारची धोरणात्मक वृद्धी आणि परिवर्तनाच्या प्रयत्नांचे नेतृत्व करतील. ते प्रॅट अँड व्हिटनीचे इन-कंट्री इंजिनियरिंग, पुरवठा साखळी, ग्राहक सेवा, संचालन आणि डिजिटल परिवर्तन केंद्रांच्या वृद्धीसाठी आणि आखणीसाठी जबाबदार असतील. आशिष या आधी एरोस्पेस, संरक्षण, बायोमेट्रिक्स, सायबर सिक्युरिटी आणि ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरसहित सर्व थेल्स इंडिया व्यवसायांसाठी डायरेक्टर आणि अध्यक्ष म्हणून काम करत होते. तेथून ते प्रॅट अँड व्हिटनीमध्ये सामील झाले आहेत.

आशीष सराफ यांच्याकडे या उद्योगातील आणि कन्सल्टिंग क्षेत्रातील २० पेक्षा जास्त वर्षांचा अनुभव आहे. एरोस्पेस, संरक्षण, बायोमेट्रिक्स आणि उत्पादन क्षेत्रात त्यांनी व्यापक काम केले आहे. थेल्समधील आपल्या कार्यकाळापूर्वी आशिष सराफ यांनी एअरबस आणि टाटा-सिकॉर्स्की संयुक्त उद्यमात विविध नेतृत्त्वाच्या भूमिका बजावल्या आहेत.

## शब्दखेळ - ३५२

खाली दिलेल्या चौकोनात मराठी पत्रकारितेचे जनक यांचे नाव लपलेले आहे शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भे | क | बा | ज | र | सा | गा | जां |
| न | इ | र्गा | जी | नि | को | ग | स |
| का | ती | कि | शो | र | य | प | य |
| क | हा | मी | शा | ची | मी | ळ | ध |
| ज | य | मो | हि | नी | सं | ज | ड |
| वा | शा | को | सा | ल | स्क्रु | स्व | ज |
| ज | घो | हि | दी | मा | त | वा | य |
| ला | ज | त्रा | मी | श्री | स्त्री | र्धा | मा |

### शब्दखेळ - ३५१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| डी | अ | मो | वि | गु | ज्जी | या | त |
| म | वि | के | क | बं | ध | दे | कु |
| हा | म | प | नो | र्लो | न | नी | ल |
| गु | रा | ब | व | सु | के | ज | री |
| स | नी | ज | स्को | हे | इ | या | स |
| हि | अ | दे | ल | ब्रो | एम | य | है |
| र | डे | दे | नु | सु | झु | कि | र |
| डा | बा | वा | भ | क | श | हो | ड |

उत्तर - विजया वाड

# नाकोडा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजची विस्तार योजना

एन एस ई आणि बी एस ई सूचीबद्ध (NSE NGIL) (BSE 541418) प्रीमियम-गुणवत्तेच्या टुटी फ्रुटी (डाइस्ड चेलोरी), सुकामेवा, धान्य आणि डाळी इत्यादींचे उत्पादन आणि व्यापार करण्यात गुंतलेल्या नाकोडा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजने पेये आणि पेये विभागात धोरणात्मक विस्ताराची घोषणा केली आहे, ज्यामध्ये त्यांच्या उत्पादन श्रेणीत मिनरल वॉटर, वायूयुक्त पेये आणि नॉन-अल्कोहोलिक पेये समाविष्ट आहेत. हे पाऊल त्यांच्या ऑफरमध्ये विविधता आणण्याच्या आणि बाजारपेठेतील स्थान मजबूत करण्याच्या व्यापक धोरणाचा एक भाग आहे. ते अन्न आणि पेय उद्योगात कार्यरत आहे, फळे, काजू, बेकरी आयटम आणि विविध कृषी उत्पादनांसह विविध प्रकारच्या अन्न उत्पादनांचे उत्पादन प्रक्रिया आणि व्यापार करण्यावर लक्ष केंद्रित करते.याव्यतिरिक्त, कंपनीने 'NOCTRL' ट्रेडमार्क वापरण्यासाठी त्यांचे पूर्णवेळ संचालक, जयेश चौधरी यांच्यावतीने व्यवहार मंजूर केला आहे.भारताचे भौगोलिकदृष्ट्या हृदय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागपूर येथे धोरणात्मक मुख्यालय असलेल्या या कंपनीला देशभरात कार्यक्षम आणि वेळेवर वितरण सुनिश्चित करून, अखंड लॉजिस्टिक गोष्टींचा फायदा होतो.नाकोडास हा मध्य पूर्व आणि युरोपीय देशांमध्ये एक प्रमुख निर्यातदार आहे आणि जगभरात त्यांचे पाऊल टाकण्याची आकांक्षा बाळगतो.

भारत ही जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे आणि प्रमुख G 20 देशांमध्ये सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था होण्याची अपेक्षा आहे आणि भारतातील अन्न प्रक्रिया क्षेत्राचा बाजार आकार २०३५ मध्ये US १,१०० अब्ज पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

# २ टी २० मुंबई लीग सीझन ३ चा चेहरा रोहित शर्मा



मोठ्या उत्साहात परतणाऱ्या T 20 मुंबई लीगसाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनने भारताचा कर्णधार आणि मुंबईकर रोहित शर्माचा सीझन ३ चा चेहरा म्हणून घोषणा केली. २६ मे पासून सुरू होणारी ही भारतातील आघाडीची स्थानिक फ्रँचायझी आधारित T२० लीग, जबरदस्त थरार, तीव्र स्पर्धा आणि मुंबईतील सर्वोत्तम क्रिकेट प्रतिभेचे प्रदर्शन देणार आहे. ही घोषणा मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली, ज्यात रोहित शर्मा, एम सी ए अध्यक्ष अजिंक्य नाईक तसेच अपेक्स कौन्सिल आणि लीग गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य तसेच संघ चालक उपस्थित होते. या कार्यक्रमात एम सी ए ने दोन नवीन संघांचीही घोषणा केली आणि रोडवे सोल्युशन्स इंडिया इन्फ्रा लिमिटेड व रॉयल एज स्पोर्ट्स अँड एंटरटेन्मेंट यांचे फ्रँचायझी चालक म्हणून स्वागत केले. याच वेळी रोहित शर्माने सिझन ३ चा भव्य ट्रॉफीचे अनावरणही केले. एम सी ए च्या आयोजनात ही लीग सहा वर्षांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा परतत आहे आणि सिझन ३ ला आतापर्यंत प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे, ज्यामध्ये २८०० हून अधिक खेळाडूंनी नोंदणी केली आहे. ही लीग मुंबईतील उदयोन्मुख क्रिकेट प्रतिभेसाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून किती महत्त्वाची आहे, हे यावरून स्पष्ट होते.

लोकार्थ

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

## शहरात आयोजन समिती बैठक; तयारीला वेग

# जैन समाजाचे बुधवारी महाअधिवेशन

**समाचार/नगर-दि.२१**

श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, नवी दिल्ली - चतुर्थ झोन आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व जैन संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जैन अल्पसंख्याक महासंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी दि. २० एप्रिल रोजी आनंद समवशरण, आनंदधाम, धार्मिक परीक्षा बोर्ड, अहिल्यानगर येथे समितीची बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीला जिल्ह्यातील विविध जैन संघटना, श्रावक संघ, जैन सोशल फेडरेशन, महावीर प्रतिष्ठान, जितो, सक्रीय सामाजिक संस्था यांचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि जैन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत राष्ट्रीय मंत्री वसंत लोढा व राजेंद्र बलदोटा यांनी महासंमेलनाच्या तयारीची माहिती देताना सांगितले की, संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून जैन बांधवांमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून पाथर्डी, शेवगाव, राहाता, वांबोरी, राहुरी, अश्वी संगमनेर, श्रीरामपूर, श्रीगोंदा, कर्जत, मिरजगाव, टाकळी ढोकेश्वर, पारनेर या भागांतून संघटनांचे अध्यक्ष आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत मोठ्या प्रमाणावर जनजागृती सुरू केली आहे. स्थानिक पातळीवर वाहनांची व्यवस्था करून दि. २३ एप्रिल रोजी आनंदधाम येथे होणाऱ्या महासंमेलनास सकाळी १० ते १ या वेळेत जास्तीत जास्त जैन समाजबांधव बांधू भगिनी या संमेलनात सहभागी होतील, याचे नियोजन सुरू आहे. या महासंमेलनास एकूण २ ते २.५ हजारांची उपस्थिती असण्याबाबत ही त्यांनी आवर्जून सांगितले आणि त्याप्रमाणे सर्व नियोजन सुरू असल्याबद्दल सर्व उपस्थितांना कळविले.



या वेळी ईश्वर अशोक (बाबूशेठ) बोरा, राष्ट्रीय समन्वयक - अखिल भारतीय जैन कॉन्फरन्स म्हणाले, हे महासंमेलन केवळ एक कार्यक्रम नसून, जैन समाजाच्या हक्कांचे आणि अस्तित्वाचे भान समाजबांधवांपर्यंत पोहोचवणारी एक प्रभावी जनजागृती चळवळ आहे. शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि कायदेशीर बाबींमध्ये अल्पसंख्याक जैन समाजासाठी असलेल्या योजना समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्याचे हे महत्त्वाचे पाऊल आहे. प्रत्येकाने १० घरांशी संपर्क साधण्याचे अभियान राबवले पाहिजे, आणि यशस्वी आयोजनासाठी कार्यविभागणी करून नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्यास समाजात एक नवा विश्वास निर्माण होईल. जैन समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत अल्पसंख्याक दर्जाचे फायदे आणि लाभ पोहोचावेत, या दृष्टिकोनातून जैन समाजातील सर्व बांधव-भगिनींनी या महासंमेलनात सहभागी व्हावे, असे आवाहन पेमराज बोंथरा यांनी आपल्या संबोधनात केले. महासंमेलनात महाराष्ट्र शासनाच्या जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी व अखिल भारतीय जैन कॉन्फरन्स - अल्पसंख्याक योजना विभागाचे कांतिकुमार जैन मार्गदर्शन करणार आहेत.

महासंमेलनात खालील शासकीय योजनांची माहिती दिली जाणार आहे आणि त्या योजनांचे फॉर्मही वाटण्यात येणार आहेत:

संमेलनात सहभागी होण्यासाठी लाभार्थ्यांनी आवश्यक शैक्षणिक, आर्थिक व ओळखपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले. बैठकीस बडीसाजन श्री संघाचे अध्यक्ष श्री पेमराज बोथरा, सतीश (बाबूशेठ) लोढा, अनिल कटारिया, पीयूष लुंकड, नितीन पटवा, ईश्वर अशोक (बाबूशेठ) बोरा, राजेंद्र बलदोटा, संतोष गांधी, रोशन चोरडिया,, सुनील मालू, कुणाल भंडारी, चेतन मेहता, महावीर बडजाते, आगरकरमळा श्रावक संघाचे अध्यक्ष अभय कोठारी, केडगाव श्रीसंघाचे कमलेश गुंदेचा, अतुल शिंगवी, राजेश भाटिया, सी ए अभय कटारिया, उमेश बोरा, महावीर प्रतिष्ठानचे हर्षल बोरा, जितोचे संगीता मुथीयान, चेतन भंडारी, सरोज कटारिया, नूतन गांधी, लता कटारिया, अपेक्षा संकलेचा, प्रतिभा गांधी, शोभा गांधी, सोनाली डुंगरवाल, शुभा बोरा, गणेश कांकरिया, किशोर गांधी, संकल्प ग्रुपच्या वैशाली चोपडा, मनीषा मुनोत, भरत बागरेचा आदी अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन जैन कॉन्फरन्स चे चतुर्थ झोन चे राजेंद्र बलदोटा यांनी केले, आभार प्रदर्शन संतोष गांधी यांनी केले.

## कत्तलीकरिता आणलेल्या ९ गोवंशीय जनावरांची सुटका

**समाचार/नगर-दि.२१**

झेंडीगेट परिसरात कत्तलीकरीता आणलेल्या ९ गोवंशीय जनावरांची कोतवाली पोलिसांनी सुटका केली. पोलिस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलिस निरीक्षक आनंद कोकरे, सपोनि योगिता कोकाटे, पोहेकॉ विशाल दळवी, संदीप पितळे, रोहिणी दरंदले, पोकॉ दीपक रोहोकले, तानाजी पवार, सूरज कदम, अभय कदम, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर, राम हंडाळ, सचिन लोळगे, सोमनाथ केकाण, महेश पवार, सोमनाथ राऊत, प्रतिभा नागरे यांनी ही कारवाई केली.



पथकाने झेंडीगेट परिसरातील बाबा बंगाली परिसरात छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत लहान मोठी गोवंशीय जनावरे असा एकूण १ लाख २५ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अल्ताफ खलील कुरेशी (वय ५०),अरताफ अल्ताफ कुरेशी (वय २४, दोन्ही रा. बाबा बंगाली, झेंडीगेट) यांच्याविरूध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ५ (क), ९(अ) सह प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ इनामदार करीत आहेत.

# विकास काम व जीर्णोध्दारासाठी आमचा विरोध नाही- आमीन शेख

**समाचार/श्रीगोंदा-दि.२१**

शेख महंमद बाबा देवस्थान जिर्णोधारास आमचा कधी विरोध नव्हता . सन १९८० साली माजी आ. बबनराव पाचपुते यांच्या माध्यमातून देवस्थान शुभोभीकरणाचे काम करण्यात आले. त्या नंतर राहुल जगताप आमदार असताना त्यांनी शेख महंमद बाबा देवस्थानच्या आत पेव्हिंग ब्लॉक व हायमॅक्स दिवा बसविण्यात आला. त्यानंतर माजी खा. सुजय विखे व माजी आ. बबनराव पाचपुते यांच्या प्रयत्नातून देवस्थानाच्या सुशोभिकरणासाठी १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. या निधितून बाहेरील पटागंणात पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात आले. व आत मध्ये विविध विकास कामे करण्यात आले. तसेच लोक वगर्णीतुन देखील ट्रस्टच्या माध्यमातून विविध विकास कामे करण्यात आले. आम्ही कधीही विकास कामास विरोध केला नाही. आम्ही देवस्थान जिर्णोधार विकास कामास विरोध करत आहोत, हा आरोप खोटा आहे. तसेच शेख महंमद बाबा यांच्या समाधीवर दररोज अर्पण करण्यात येणार शेरा व दर गुरुवारी होणारे अन्नदानास आम्ही विरोध केला, हा आरोप देखील खोटा असल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष आमीन शेख यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे. दि.१६ रोजी शेख महंमद बाबा देवस्थान जिर्णोधार होण्यासाठी श्रीगोंदा तहसिल कार्यालयात आमदार विक्रमसिंह पाचपुते व प्रशासकीय अधिकारी पोलीस उपअधिक्षक मिलिंद वाखारे, प्रातांधिकारी श्रीनिवास चिंचकर, पोलीस निरिक्षक किरण शिंदे, मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत मॅडम, नायब तहसिलदार नेवसे या प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत आमची बैठक संपन्न झाली. या बैठकीत शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्टच्या नावात बदल करुन शेख महंमद बुवा देवस्थान करावे अशी सुचना आम्हाला करण्यात आली. ही सुचना आम्ही मान्य केली. देवस्थान जिर्णोधार काम करण्यासाठी ट्रस्टच्या मान्यतेने एक शासकीय समिती स्थापन करावी लागेल. त्याकामी ट्रस्टची ना हरकत द्यावी लागेल, या शासकीय समितीत विद्यमान आमदार, तहसीलदार, पोलीस निरिक्षक, नगर परीषद मुख्याधिकारी, सार्वजनिक बांधकाम उप अभियंता, ट्रस्टच्या वतीने व यात्रा कमेटीच्या वतीने एक-एक सदस्य राहील असे एकुण सात सदस्याची समिती राहील. ही समिती स्थापन करण्यासाठी ट्रस्टच्या वतीने बैठकीत मान्यता देण्यात आली. शेख महंमद बाबा यांचे वंशज, पुजारी यांची निवासस्थाने देवस्थानच्या जागेतच बांधुन देण्यात येईल. कोर्टात देवस्थानच्या बाबत असलेले सर्व दावे ट्रस्ट मागे घ्यावीत व यात्रा कमेटीच्या वतीने देखील कोर्टात असलेले दावे मागे घेण्यात येईल असे बैठकीत ठरवण्यात आले. परंतू बैठकीत ठरवण्यात आलेले विषय यात्रा कमेटीस मान्य नसल्याने समजते.

# चितांबर विद्या मंदिरमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा


**समाचार/नगर-दि.२१**

येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिरमध्ये २००५ ते २०२० या वर्षांतील विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा नुकताच आयोजित करण्यात आला होता. आपले शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून व्यावसायिक व कौटुंबिक जीवनात स्थिरता लाभल्यानंतरही अनेक विद्यार्थ्यांना आपल्या शाळेची ओढ स्वस्थ बसू देत नाही. शालेय वयातील मित्र-मैत्रिणी, त्यांच्यासोबत व्यतीत केलेला रम्यकाळ आणि अनेकानेक आठवणी अनेकदा मनाला सुखद गारवा प्राप्त करून देतात. याच ओढीतून या विद्यार्थ्यांनी या मेळाव्याचे आयोजन केले होते. वर्षानुवर्षे कानात गुंजणारा शाळेच्या घंटेचा मंगलमय आवाज, शालेय नित्य प्रार्थना, हजेरी, शिक्षकांचे अध्यापन, वर्गातील खोड्या आणि अगदी हातावर मिळणारा छडीचा प्रसाद या सर्वच अनुभवांची यानिमित्त शाळेमध्ये पुनरावृत्ती करण्यात आली. शालेय तासिकेनंतर विद्यार्थ्यांनी आपला सध्याचा परिचय आणि कार्यक्षेत्राची ओळख करून दिली. शाळेप्रती आदर आणि शालेय आठवणींना उजाळा देताना अनेकांना शब्द सुचेनासे झाले होते.



आवडत्या शिक्षक-शिक्षिकांसोबत बोलण्यात, फोटोसेशन करण्यात दिवस कधी संपला ते समजलेच नाही. शाळा-शिक्षकांप्रती स्नेहभाव अर्पण करत व शाळेला भेटवस्तू देत जड अंतकरणाने अनेकांनी शाळेचा निरोप घेतला. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांनी प्रास्ताविक केले. शिक्षकांच्या वतीने प्रशांत कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.

गणेश उघडे यांनी सूत्रसंचालन केले. स्नेह मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी राहुल पाटोळे, शिवम पालवे, शुभम दातरंगे, नेहा खोमणे, मयुरी दोंता तसेच विद्यालयातील शिक्षक शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.



## शहरात रविवारी रत्नशास्त्र कार्यशाळा

**समाचार/नगर-दि.२१**

येथील १९८५ पासुन कार्यरत असलेले नामांकित ज्येष्ठ रत्न, ज्योतिष व वास्तू सल्लागार डॉ.गोपाळकृष्ण रत्नपारखी यांची रत्नशास्त्र कार्यशाळा रविवार दि.२७ एप्रिल रोजी ला सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत प्रोफेसर चौकामधील हॉटेल रोज गोल्ड (ब्रम्हभोज) येथे आयोजित करण्यात आली आहे.

सह्याद्री अस्ट्रॉलॉजिकल रिसर्च सेंटर आणि श्रीराम ज्योतिष कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत रत्नांचा उपयोग कसा होतो? रत्नाचा भविष्याशी संबंध काय? रत्न कोणी धारण करावे? रत्न कसे असावे? कोणती रत्ने एकाच वेळी धारण करू नयेत? रत्नाचे आयुष्य, रत्नाचे प्रकार, रत्न परिक्षण, महारत्ने, माणिक, मोती, प्रवाळ, पुष्कराज, पाचू, हिरा, निलम, गोमेद, वैडुर्य (लसण्या), रत्नांच्या प्रजाती याविषयी शास्त्रोक्त माहिती सप्रात्यक्षिक दिली जाणार असुन लाखो रुपये क़िमती चे रत्न प्रत्यक्ष निरीक्षणेसाठी ठेवले जाणार आहेत. विशेष म्हणजे कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या सर्वांना समारंभपूर्वक प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी प्रवेश मर्यादित असून नाव नोंदणी करण्यासाठी आयोजक शितल देशमुख (८९९९०९६५८७/ ९९६०६४४३४३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन श्रीराम ज्योतिष कार्यालयाने केले आहे.

## अरुणकाकांच्या आरोग्यासाठी पुण्यातील गुरुव्दारात प्रार्थना

**समाचार/नगर-दि.२१**

ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी रविवारी (दि.२० एप्रिल) पुणे कॅम्प येथील गुरुसिंग सभा गुरुद्वारा (हॉलीवुड) येथे अरदास (प्रार्थना) करण्यात आली.

अरुणकाका जगताप यांच्यावर पुणे येथील खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, ते आजारातून बरे होण्यासाठी गुरुद्वाऱ्यात अरदास करण्यात आले. तर सामुदायिकपणे अरुणकाकांच्या दिर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. यावेळी आमदार संग्राम जगताप, सुहास टिंगरे, जनक आहुजा, प्रितपालसिंह धुप्पड, मुन्नाशेठ जग्गी, प्रदीप धुप्पड, टोनी मक्कर, गणेश विधे, गुरुद्वाऱ्याचे विश्वपस्त सरदार बेदी आदी उपस्थित होते.

सर्वांच्या प्रार्थनेने अरुणकाका जगताप लवकरच बरे होवून नगर शहरात परतणार असल्याची भावना जनक आहुजा यांनी व्यक्त केली.



## निंबळक बायपास येथे मृतदेह आढळला

**समाचार/नगर-दि.२१**

निंबळक बायपास येथे शुक्रवारी सायंकाळी एका इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. दरम्यान, याबाबत माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास केला. सदरचा इसम हा मनोरूग्ण असावा, आठ दिवसांपासून तो त्या परिसरात फिरत होता. उष्माघाताने त्याचा मृत्यू झाला असावा, असे एमआयडीसी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी यांनी सांगितले. या घटनेबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे, असेही चौधरी यांनी सांगितले. निंबळक बायपास परिसरात गेल्या काही दिवसात मृतदेह आढळल्याची ही तिसरी घटना आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

## उत्स्फूर्त सहभाग; औषध फवारणीचे प्रात्यक्षिक

# कार्यशाळेत युवक-युवतींनी घेतले ड्रोनचे प्रशिक्षण

**समाचार/नगर-दि.२१**

नगर शहरात अहमदनगर एज्युकेशन सोसायटी व सेरेब्रोस्पार्क इनोव्हेशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने ड्रोन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलच्या सभागृहात आयोजित या एकदिवसीय कार्यशाळेला युवक, युवती, शिक्षक, पालक व शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

याप्रसंगी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सल्लागार सदस्य भूषण भंडारी, राजेश कुलकर्णी, ड्रोन मार्गदर्शक गणेश थोरात, मिहीर केदार, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, रुपीबाई बोरा हायस्कूलचे मुख्याध्यापक अजय बारगळ, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य संदीप उबाळे, सेनापती बापट विद्यालय (पारनेर) मुख्याध्यापक संतोष कुलकर्णी, भिंगार हायस्कूलचे मुख्याध्यापक रावसाहेब कासार, साईनाथ विद्यालय (शिर्डी) मुख्याध्यापक अभिमन्यू डुबल आदींसह युवक-विद्यार्थी व पालक वर्ग आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




छायाताई फिरोदिया म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात कौशल्य मिळवले तर त्याच क्षेत्रात करिअर घडू शकते. ड्रोन हे केवळ छंद नसून उत्पन्नाचे साधन ठरू शकते. आधुनिक शेती आणि इतर क्षेत्रात ड्रोन काळाची गरज बनले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गणेश थोरात यांनी सांगितले की, गावागावात ड्रोन पोहचविण्याची चळवळ सुरु आहे. विद्यार्थ्यांना ड्रोन बनवणे, त्याचे भाग, तांत्रिक बाबी आणि ड्रोन उडविण्याचे संपूर्ण प्रशिक्षण दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. भूषण भंडारी यांनी प्रशिक्षणाचे नियम व कायदेशीर बाबी स्पष्ट करत सांगितले, ड्रोन प्रशिक्षण आणि अधिकृत लायसन्सशिवाय ड्रोन उडविणे नियमबाह्य आहे. त्यामुळे सर्वांनी अधिकृत प्रशिक्षणच घेणे आवश्यधक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेत उपस्थितांना ड्रोनच्या मूलभूत रचनेपासून ते त्याचे उड्डाण कसे करावे याचे सखोल प्रशिक्षण व्याख्यान व प्रात्यक्षिकाद्वारे देण्यात आले. विविध प्रकारच्या ड्रोनची माहिती देताना, त्यांच्या कृषी, औद्योगिक, आपत्कालीन सेवा, फिल्मनिर्मिती, सुरक्षा आणि नकाशे बनवणे अशा विविध उपयोगांवर प्रकाश टाकण्यात आला. फोन ड्रोन कॅमेरा, त्यातील व्हिडिओ क्षमता, लाईव्ह ट्रान्समिशन, अडथळे ओळखण्याचे तंत्रज्ञान याविषयीही तपशीलवार माहिती दिली गेली. कार्यशाळेच्या शेवटी ड्रोन उडविण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तर शेतामध्ये औषध फवारणी करण्यासाठी वापरले जाणाऱ्या ड्रोनचे उड्डाण करुन फवारणीचे प्रात्यक्षिक दाखवले.

# अंबिका महिला बँकेची उच्चांकी व्यवसाय वाढ- आठरे

**समाचार/नगर-दि.२१**

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षा अखेरीस बँकेच्या एकुण व्यवसायामध्ये १७.१९ टक्के वाढ होऊन एकूण व्यवसाय १८९.३५ कोटींचा झालेला आहे.तसेच या आर्थिक वर्षात बँकेस सर्व तरतुदी वजा जाता निव्वळ नफा रू.१ कोटी १९ लाख झालेला आहे. या वर्षातील सर्वोत्तम कामगिरी बद्दलची माहिती अध्यक्षा भारती आठरे यांनी दिली.

आर्थिक वर्षा अखेर बँकेच्या एकूण ठेवी रू.१११.९६ कोटी असून कर्ज वितरण रू.७७.३७ कोटी आहेत. गतवर्षीच्या तुलनेत बँकेच्या ठेवींमध्ये १२.६३ कोटी रू.आणि कर्जामध्ये १५.१३ कोटी रू.वाढ झालेली आहे.बँकेचे वसुल भागभांडवल रू. ३.१७ कोटी असून खेळते भांडवल रू.१३१.६४ कोटी रू. आहे. बँकेची एकूण गुंतवणूक ४५.२९ कोटी रू.असून त्या पैकी २९.७० कोटी रू. सरकारी कर्जरोखे गुंतवणूक आहे. वसुल भांडवल पर्याप्तता २३.१५ टक्के, नक्त एन.पी.ए. 0.00 टक्के, नियमित लेखापरिक्षण वर्ग 'अ', रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे फायनान्शिअल साउड ॲण्ड वेल मॅनेजमेंटचे (FSWM) चे सर्व निकष बँक पूर्ण करत आहे. या सर्व बाबी बँकेची अहवाल सालातील प्रगती दर्शवितात.सभासदांच्या,खातेदार यांचे क्रियाशील सहकार्यामुळे बँकेला हे यश मिळालेले आहे.





बँकेच्या एकूण ५ शाखा असुन मोठया संख्येने ग्राहक बँकिंग सेवेचा लाभ घेत आहेत. बँकेने ग्राहकांसाठी मोबाईल बँकींग, फोन पे, गुगल पे, यु.पी.आय., ए.टी.एम. व अन्य डिजिटल सेवा सुरू केलेली आहे तसेच नुकतेच बँकेने ठेवीवरील व कर्जाचे व्याजदर संतुलित केले असून सोनेतारण कर्जमर्यादा वाढविली आहे यांचा सर्व ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपाध्यक्षा शोभा खरपुडे यांनी केले आहे.

संस्थापिका प्रा.मेधाताई काळे म्हणाल्या की, कस्टमर रिस्क, कॅश व्यवहारावरील मर्यादा, उत्पन्न कर प्रणाली, ऑनलाईन व्यवहार व त्यामधील धोके, मुदत संपलेल्या ठेवीचे वेळेत नुतनीकरण व एकूण बँक प्रणाली बाबत सभासद, खातेदार यांनी जागरूक राहणे आवश्यक आहे यासाठी बँक प्रयत्न करत आहे.

तसेच रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्व व Money Laundering ct2002 या कायद्यातील तरतुदीनुसार बँकांनी सर्व ग्राहकांची ओळख पटवून घेणे कायद्याने बंधनकारक आहे. केवळ नवीन खातेदारांपुरतीच ही बाब बंधनकारक नसून बँकेत चालू असलेल्या सर्व जुन्या खातेदारांकडून ठराविक कालावधीनंतर नव्याने के.वाय.सी करणे अनिवार्य आहे त्यांची खातेदारांनी पूर्तता करावी.

बँकेस आत्तापर्यंत राज्यस्तरीय एकूण अकरा व नॅशनल पातळीवरील एक असे एकूण बारा सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार मिळालेले आहेत या यशामध्ये प्रा. डॉ. संध्या जाधव, आशा मिस्कीन, सुमन गोसावी, शांता मोरे, ॲड. शारदा लगड, सरोजनी चव्हाण, सविता गांगर्डे, शोभना चव्हाण, विजया काकडे, तज्ञ संचालक सी.ए. ज्ञानेश्वर काळे, रमेश परभणे, मा.संचालिका डॉ. क्रांती अनभुले, दिवंगत संस्थापक संचालिका, मा.अध्यक्षा प्रा. पुष्पा मरकड, प्रा. पुष्पलता वाघ, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश गायकवाड व सर्व अधिकारी कर्मचारी वर्ग यांचे मोलाचे योगदान आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा

# समर्थ प्रशालेचे नाव उज्वल करावे- क्षीरसागर




**समाचार/नगर-दि.२१**

यंदा शाळेचे तथा संस्थेचे नाव ४२ विद्यार्थांनी जसे मोठे केले तसेच पुढील वर्षी १४२ मुलांनी प्रशालेचे व संस्थेचे नाव जगभरात खूप मोठे करावे, असे प्रतिपादन समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव तथा शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर यांनी केले.

सर्व गुणवंत व प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळा प्रसंगी क्षीरसागर बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य स्वप्निल कुलकर्णी, प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर आदी मान्यवर व्यासपीठावर होते.

हे युग स्पर्धेचे आहे, अशा कौतुक सोहळ्यातून मुलांच्या पाठीवर पडलेली शाबासकीची थाप आगामी काळात प्रेरणा देण्यास पोषक ठरते. पालकांनी देखील खूप उत्साही असणे अतिशय महत्वाचे आहे. पालक व शिक्षकांनी मुलांवर घेतलेली ही मेहनत संस्थेसाठी नक्कीच भूषणावह ठरेल व भविष्यात देखील अशीच कामगिरी नोंदवत पालकांचे, शिक्षकांचे, शाळेचे व पर्यायाने संस्थेचे नाव उंचावत रहा असे मनोगत क्षीरसागर यांनी व्यक्त केले.प्रशालेच्या मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर यांनी प्रास्ताविकातून आपल्या भावना मांडल्या. वर्षा खणकर व विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. पालकांमधून अर्चना दळवी व भंडारी यांनी मनोगतातून सर्वांचे अभिनंदन केले व हे शिक्षकांच्या मेहनतीने यश आहे, संस्था सतत मुलांच्या कलागुणांना वाव देते, असे त्या म्हणाल्या. सर्वांना पुढील वाटचालसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी सर्व ४२ विद्यार्थ्यांसह त्यांचे मार्गदर्शक शिक्षक - भगवान जाधव, गणेश पारधे, अश्विनी जाधव, पूजा खटावकर, वृषाली कुलकर्णी, संपदा नगरकर, प्रियंका कासार, प्राची देशमुख व अंजली देशपांडे यांचे कौतुक केले गेले.

# नगरमध्ये आठ केंद्रांवर मेमध्ये बालसंस्कार वर्ग

**समाचार/नगर-दि.२१**

श्रीराम मंदिर अयोध्या चे कोषाध्यक्ष गुरुगोविंद गिरी महाराज यांच्या प्रेरणेने ४० वर्षांपूर्वी संगमनेर मध्ये गीता परिवाराची स्थापना झाली. त्यानंतर डॉ. संजय मालपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली देशात व देशाबाहेर ही गीता परिवाराचे कार्य चालू आहे. या अंतर्गत भारतीय संस्कृतीचे मूल्य हे जर लहान मुलांमध्ये आली तर ते भारताचे भविष्य घडवू शकतात या विचाराने लहान मुलांसाठी संस्कार शिबिराचे आयोजन, ऑनलाईन भगवद् गीता असे बरेच उपक्रम आयोजित केले जातात. दरवर्षी मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचा बालसंस्कार वर्गाला प्रतिसाद पाहून यावर्षी आठ केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे,

विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून जवळ असणाऱ्या केंद्रावर सहभाग नोंदवता येईल त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ व खर्चही वाचणार आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्याने प्रवेश दिला जाणार आहे मर्यादित जागा शिल्लक आहेत. पालकांनी आपल्या मुलांना वर्गात प्रवेश घेऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गीता परिवार अहिल्यानगर दक्षिणच्या जिल्हाध्यक्ष सुनंदा रविंद्र सोमाणी, उपाध्यक्ष प्रतिभा बजाज, सेक्रेटरी सोमनाथ नजान, कोषाध्यक्ष अलका नावंदर व सर्व कार्यकर्त्यांनी केले आहे. बाल संस्कार वर्ग - कालावधी : ०६ मे २०२५ ते १५ मे २०२५, वेळ : सकाळी ०९ ते ११, वयोमर्यादा : ०९ ते १५ वर्षे (४ थी ते ९ वी), इचरज बाई फिरोदिया प्रशाळा, नवी पेठ रामकृष्ण इंग्लिश मीडियम स्कूल, भवानीनगर, मुरलीधर सारडा विद्यार्थी भवन, तारकपुर बस स्टँडच्या मागे, आनंद विद्यालय गुलमोहर रोड, सावेडी, ऐश्वर्या हॉल, श्रीराम चौक, लक्ष्मीनारायण मंदिर, कायनेटिक चौक, विठ्ठल मंदिर, शेंगा गल्ली, विनायकनगर (लेडीज हॉल). अशा एकूण आठ केंद्रावर एकाच वेळी हे संस्कार वर्ग चालवले जाणार आहेत. आनंद विद्यालय गुलमोहर रोड येथे संध्याकाळी पाच ते सात या वेळेत लहान मुलांसाठी (पहिली ते तिसरी) एक केंद्र चालवले जाईल.

# महासंमेलनात सहभागी व्हा; महावीर युवक मंडळाचे आवाहन

**समाचार/नगर-दि.२१**

श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, नवी दिल्ली, चतुर्थ झोन अहिल्यानगर व जिल्ह्यातील सर्व जैन संघटनांच्यावतीने बुधवारी दि. २३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता येथील धार्मिक परीक्षा बोर्डमध्ये विशेष महासंमेलन आयोजित करण्यात आले आहे. या महासंमेलनास शहरासह जिल्ह्यातील जैन समाजातील बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, सेक्रेटरी आनंद मुथा व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



जैन समाजाचा अल्पसंख्याक दर्जा व त्याअंतर्गत मिळणाऱ्या शासकीय योजनांबाबत विशेष माहिती ललित गांधी (अध्यक्ष- जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन) आणि कांतीकुमार जैन (अखिल भारतीय जैन कॉन्फरन्स, अल्पसंख्याक योजना विभाग) हे मान्यवर देणार आहेत.

विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, महिला व युवकांसाठी स्वयंरोजगार कर्ज योजना, व्यवसायासाठी अनुदान व कर्ज, प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल), कौशल्य विकास योजना, प्राचीन तीर्थ व ग्रंथांचे संरक्षण, जैन पाठशाळांसाठी सहाय्य योजना, परदेशात शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज योजना आदी शासनाच्या लोक कल्याणकारी योजना उपलब्ध असून त्यांची माहिती जैन समाजामधील सर्वांपर्यंत पोहोचावी म्हणून या महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

उपलब्ध शासकिय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक फॉर्म संमेलन स्थळी वितरित केले जाणार आहेत. योजनांचा लाभ मिळवण्यासाठी फॉर्म भरून सादर करणे आवश्यक आहे.

शहर आणि जिल्ह्यातील गरजू लाभार्थ्यांनी शैक्षणिक ओळखपत्रे व आर्थिक कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन जय आनंद महावीर युवक मंडळातर्फे करण्यात आले आहे.

**जागा भाड्याने देणे**
शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सविताबाई फिरोदिया शाळेजवळ १३०० स्क्वे.फूट जागा क्लासेस, ऑफिससाठी उपयुक्त.
संपर्क 8999446516

**गाळा भाड्याने देणे**
महालक्ष्मी चेंबर (अपार्टमेंट) बेसमेंट शॉप नं.बी ३, २२० sq.ft. ऑफिससाठी उपयुक्त फर्निचर आहे. मोरया मंगल कार्यालयासमोर सावेडी
मो. 7720007727

**भाड्याने देणे आहे**
सावेडीरोड दीपक पेट्रोल पंपासमोरील दीपक हाईट दुसरा मजल्यावरील सर्व सुविधायुक्त जागा डॉक्टरांना ओ पी डी साठी भाड्याने देणे आहे
संपर्क- विलास काळभोर 9422320299

**घर विकणे आहे**
गुलमोहर रोड, सावेडी येथे दोन मजली ६ रूम, २ किचन, २ संडास-बाथरूम, २ बाल्कनी किंमत ४५ लाख अर्जंट विकणे आहे
9890103648
7768003126

सहावे पुण्यस्मरण...
। स्मृती अशी कीर्ती रुपे उरावे ।
आदरणीय **आबा** यांना पुण्यतिथीनिमित्त
*भावपूर्ण सुमनांजली*
ना मोठेपणा मिरविला कधी
आधारवड कल्पवृक्ष सर्वांचे
माणुसकी स्नेह हे प्रतीक तयाचे।



**कै. माधवराव द. मुळे**
मृत्यू दिनांक २१ एप्रिल २०१९
- दुःखांकित -
डॉक्टर श्री. पांडुरंग विठ्ठल निक्रड
श्री. मुकेशदादा माधवराव मुळे
श्री. तान्हाजी आबाजी पठारे
श्री. संतोष तान्हाजी पठारे
सौ. शुभदा संतोष पठारे
कु. सक्षम संतोष पठारे
तसेच
**जगदाळे, दहातोंडे, पठारे परिवार**

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दि.१७/०४/२०२५ ते दि.२३/०४/२०२५
KESARI CHAPTER-2 (हिंदी)
09.30 AM 11.00 AM
12.00 PM 02.45 PM
05.15 PM 08.00 PM
09.45 PM 10.45 PM
सुशीला सुजीत (मराठी)
05.00 PM
मुक्ताई (मराठी)
07.00 PM
छावा (हिंदी)
02.00 PM
JAAT (हिंदी)
10.00 AM 01.00 PM
04.30 PM 07.00 PM
10.30 PM
for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
AVAILABLE ON book my show
CONNPLEX
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

**डागा शांतीलाल डागा**
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०
शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकामाची रांगोळी

**ग्रामपंचायत कार्यालय केलवड बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर**

निविदा नोटीस (प्रपत्र-१)

जाहीर निविदा अंतर्गत निविदा सूचना क्र. ग्राप/वर्ग म.स.सं./०१/कॉल-१/सन २०२४-२५ दिनांक २१/०४/२०२५

नोंदणीकृत मजूर संस्था /सु.बे. नोंदणीकृत अभियंता/ विक्रेत्यांकडून **ग्रामपंचायत कार्यालय केलवड बु., ता. राहाता, जि.अहिल्यानगर** येथे पुढील काम परसेंटेज (टक्के) दराने घ्यायचे आहे. कामाचा तपशील पुढे दिलेला आहे. १. सदर कामाचे कोरे निविदा अर्ज दि. २१/०४/२०२५ ते २७/०४/२०२५ या कालावधीत **ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी केलवड बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर** यांच्या कार्यालयात सकाळी १०.०० ते सायं.५.०० कार्यालयीन कामाच्या वेळेत (सर्व सुट्टी वगळून) मिळतील. २. निविदा दि. २८/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० नंतर उघडल्या जातील. ३. सदर कामाचे कोणतेही दरपत्रक किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा अधिकार व उशिरा आलेले कोणतेही दरपत्रक मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे. तसेच अटीयुक्त व त्रुटीयुक्त दरपत्रक फेटाळण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ. नं. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संचाची कि. रु. | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे केलवड बु., ता. राहाता येथे (सोनवणे गोडगेवस्ती) बंदिस्त गटार करणे. | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे. | २५२८५७/- | १ टक्का | २४०/- | खुला |

**टीप** - निविदा संबंधी अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. निविदा व अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदांपैकी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

**ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी/सरपंच**
**ग्रामपंचायत केलवड बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर**

UNITED PHARMA Pharmaceutical Distributors
Sargical & Generic Medicine
9049934444
7972378081
Near Kedgaon Ves, Kedgaon

